RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२७९ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.११ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## स्वच्छ राज्यांच्या यादीत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक मध्य प्रदेश दुसऱ्या तर छत्तीसगढ तिसऱ्या क्रमांकावर

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

स्वच्छ राज्यांच्या यादीत महाराष्ट्राचा पहिल्या क्रमांकाचं राज्य ठरलं आहे. केंद्र सरकारच्या वार्षिक स्वच्छता सर्वेक्षणात महाराष्ट्राने पहिला क्रमांक पटकावला आहे. तर स्वच्छ शहरांच्या यादीत नवी मुंबई हे शहर तिसऱ्या क्रमांकावर आहे. स्वच्छ राज्यांमध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर, मध्य प्रदेश दुसऱ्या तर छत्तीसगढ तिसऱ्या क्रमांकावर निवड झाली आहे. पीटीआयने या विषयीचं वृत्त दिलं आहे.



**स्वच्छ शहरांच्या यादीत नवी मुंबई तिसऱ्या क्रमांकावर**

स्वच्छ शहरांच्या यादीत नवी मुंबई या शहराचा तिसरा क्रमांक आहे तर सर्वात स्वच्छ शहर म्हणून इंदूर या शहराची निवड झाली आहे. इंदूरने सर्वात स्वच्छ शहर म्हणून पहिला क्रमांक मिळवण्याचं हे सलग सातवं वर्ष आहे. गुजरातमधलं सूरत हे शहर दुसऱ्या क्रमांकावर तर महाराष्ट्रातल्या नवी मुंबईने स्वच्छ शहरांच्या यादीत तिसरा क्रमांक पटकावला आहे.देशाची राजधानी दिल्ली या ठिकाणी झालेल्या पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शहरं आणि राज्यांच्या प्रतिनिधींना पुरस्कार दिले आहे. स्वच्छ भारत मिशन अर्बन अंतर्गत २०१६ मध्ये वार्षिक पुरस्कार देण्यास सुरुवात झाली. २०२३ च्या पुरस्कारांमध्ये ४,४१६ शहरी स्थानिक संस्था, ६१ छावण्या आणि ८८ छोटी शहरे समाविष्ट आहेत.

गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकारतर्फे (एमओएचयुए) तर्फे देश पातळीवर घेण्यात आलेल्या 'स्वच्छ सर्वेक्षण २०२३' चा निकाल नुकताच जाहीर झाला. सासवड आणि लोणावळा नगरपरिषदांचा पहिल्या तीन क्रमांकांच्या पुरस्कारांमध्ये समावेश आहे. सासवड व लोणावळा नगरपरिषदेस एक लाख लोकसंख्येपेक्षा कमी लोकसंख्येच्या वर्गवारीमध्ये पुरस्कार प्राप्त झाला असून ११ जानेवारी रोजी दिल्ली येथे होणाऱ्या कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते या नगरपरिषदांना गौरविण्यात आले.'स्वच्छ सर्वेक्षण २०२३' स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर प्रथम तीन क्रमांकामध्ये येण्यासाठी आठ ते दहा शहरांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले होते. यामध्ये बारामती, इंदापूर, जेजुरी, शिरुर, भोर, सासवड, लोणावळा यांचा समावेश असून यापैकी प्रत्येक नगरपरिषदेने स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेत यापूर्वी विविध गटामध्ये राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार प्राप्त केलेले आहेत. सासवड नगरपरिषदेने या स्पर्धेकरिता जय्यत तयारी केली होती.

## प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त ५५ देशांमध्ये २२ जानेवारीला होणार प्रार्थना कार्यक्रम

### आफ्रिका, दक्षिण अमेरिकेतील लोक, म्यानमार, युरोप आदी अनेक ठिकाणचे हिंदू सहभागी होणार

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त भारतातच नव्हे तर विदेशातही विविध कार्यक्रमांचे आयोजन विश्व हिंदू परिषदेने (विहिंप) केले आहे. जगभरातील ५५ देशांमध्ये प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या दिवशी प्रार्थना कार्यक्रम आयोजिण्यात आले आहेत. विदेशात विहिंप तर्फे आयोजिण्यात येणाऱ्या प्रार्थना कार्यक्रमांत आफ्रिका, दक्षिण अमेरिकेतील लोक, म्यानमार, युरोप आदी अनेक ठिकाणचे हिंदू सहभागी होणार आहेत. ज्या लोकांनी हिंदू धर्म स्वीकारला आहे त्यांनाही आवर्जून या प्रार्थना कार्यक्रमांत सहभागी करून घेतले जाईल. विहिंपचे सहसचिव स्वामी विज्ञानानंद यांनी सांगितले की, प्रार्थना कार्यक्रमांत विदेशातील हिंदूंना जास्तीत जास्त संख्येने समाविष्ट करून घेतले जाईल.



**राम मंदिरात २४०० किलो वजनाची घंटा; आवाज १० किलोमीटर पर्यंत ऐकू येईल!**

अयोध्येतील भव्यदिव्य प्रभू श्री राम मंदिरात तब्बल २४०० किलो वजनाची घंटा बसविण्यात येणार आहे. या घंटेचा आवाज १० किलोमीटरपर्यंत ऐकू येईल. उत्तर प्रदेशच्या ऐटा जिल्ह्यामधील जलेसर हे पितळ व अन्य काही धातूंपासून वस्तू बनवण्याकरिता जगप्रसिद्ध गाव आहे. विशेषतः मंदिरांमधील घंटा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात बनवल्या जातात. देशातील प्रसिद्ध मंदिरांमध्ये येथील घंटा आहेत. जलेसरच्या रामभक्तांनी ही घंटा अयोध्येतील राम मंदिरासाठी खास बनवली आहे. २४०० किलोंच्या मुख्य घंटेव्यतिरिक्त ५१ किलोंच्या सात घंटादेखील भेट देण्यात आल्या. या घंटांमध्ये कुठेही जोडकाम केलेले नाही. अखंड धातूपासून त्या बनवण्यात आल्या आहेत. जलेसरचे आदित्य मित्तल, मनोज, रिशांक, प्रशांत मित्तल हे ५०० रामभक्तांसह अयोध्येला पोहोचले.


## दिल्ली, जम्मू काश्मीरमध्ये भूकंपाचे तीव्र धक्के पाकिस्तानही हादरले, लोक भयभीत

### भूकंपाचे धक्के जाणवताच अनेक लोक घर आणि त्यांच्या कार्यालयाबाहेर पडली

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

गुरुवारी दिल्ली-एनसीआर परिसरात भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. त्याशिवाय जम्मू काश्मीरच्या पुंछ जिल्ह्यातही भूकंपाचा धक्का अनुभवल्याचे लोकांनी सांगितले. या भूकंपाचे केंद्रबिंदू अफगाणिस्तानातील फैजाबाद इथं होतं. जवळपास ६.१ रिश्टर स्केलचे हे धक्के असल्याने नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं.

भूकंपाचे धक्के जाणवताच अनेक लोक घर आणि त्यांच्या कार्यालयाबाहेर पडली. सध्या या धक्क्यामुळे कुठेही नुकसान झाल्याची बातमी नाही. भूकंपाचे हे धक्के केवळ भारतातच नाही तर शेजारील पाकिस्तानातही लोकांना जाणवले. याठिकाणाहून अनेक फोटो समोर आलेत ज्यात घाबरलेल्या अवस्थेत लोकांनी घरातून बाहेर पळ काढला. इस्लामाबाद येथे लोक घरातून पळतानाचे व्हिडिओ समोर आले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, पाकिस्तानात या भूकंपाचे सर्वाधिक धक्के बसले आहेत. जम्मू काश्मीरच्या दक्षिणेकडील भागात राजौरी, पुंछ भागातही भूकंपाचे धक्के जाणवले.



त्याठिकाणी लोक सुरक्षित ठिकाणी धाव घेत होते.

**भूकंप आल्यावर काय करावे आणि काय करू नये**

भूकंपाचे झटके जाणवल्यास मुळीच घाबरू नका. सर्वप्रथम, आपण एखाद्या इमारतीत असाल तर त्या इमारतीतून बाहेर मैदानात या. इमारतीतून खाली येताना लिफ्टचा वापर करू नका. हे भूकंपाच्या काळात धोकादायक ठरू शकते. तसेच, इमारतीतून खाली येणे शक्य नसेल, तर जवळच्या एखाद्या टेबलाखाली अथवा बेड खाली लपा.

## शिंदे यांच्या बाजूने निकाल लागल्याने अजित पवार गट निश्चिंत

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

शिवसेनेतील फुटीवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाच्या बाजूने निकाल दिल्याने राष्ट्रवादीतील अजित पवार गटाला मोठा दिलासा मिळाला आहे. महिनाभरातच राष्ट्रवादीतील फुटीवर अध्यक्षांकडून निकाल अपेक्षित आहे.

शिवसेनेतील फुटीवरील निकालानंतर राष्ट्रवादीतील फुटीवर महिनाभरात निकाल देण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने अध्यक्षांना दिला आहे. शिवसेनेतील फुटीवरील सुनावणी पूर्ण होऊन निकालही जाहीर करण्यात आला. आता लगेचच राष्ट्रवादीच्या शरद पवार आणि अजित



पवार गटाने परस्परांचे आमदार अपात्र ठरविण्यासाठी केलेल्या अर्जांवर अध्यक्षांकडे लगेचच सुनावणी सुरू होईल.

शिवसेनेतील फुटीवरील निकालात अध्यक्ष नार्वेकर यांनी पक्षाची सूत्रे कोणाकडे यावर निरीक्षण नोंदविताना विधिमंडळातील बहुमताचा आधार घेतला. राष्ट्रवादीतील फुटीनंतर विधिमंडळात अजित पवार गटाचे बहुमत आहे. पक्षाचे ५३ पैकी ४० पेक्षा अधिक आमदार हे अजित पवार यांच्याबरोबर आहेत. यामुळ विधानसभेत अजित पवार गटाचे संख्याबळ अधिक आहे. शिवसेनेत पक्षादेशावरून प्रतोद कोण हा वाद झाला होता. सुनील प्रभू की भरत गोगावले यांच्यापैकी कोणाचा पक्षादेश कायदेशीर यावर काथ्याकूट झाला. राष्ट्रवादीत तसा वाद नाही. कारण राष्ट्रवादीच्या विधिमंडळ प्रतोदपदी अनिल पाटील आहेत. पक्षातील फुटीनंतर त्यांनी अजित पवार यांना साथ दिली. यामुळे राष्ट्रवादीतील फुटीच्या सुनावणीत प्रतोदाचा मुद्दा वादग्रस्त ठरणार नाही.शिवसेनेतील फुटीवरील सुनावणीत ठाकरे वा शिंदे गटाचे कोणीच आमदार अपात्र ठरले नाहीत. राष्ट्रवादीतील फुटीत शरद पवार किंवा अजित पवार गटाचे आमदार अपात्र ठरण्याची चिन्हे नाहीत. शिवसेनेतील फुटीत एकनाथ शिंदे यांच्या बाजूने निकाल लागल्याने राष्ट्रवादीतील फुटीत अजित पवार यांच्या गटाच्या बाजूनेच निकाल लागेल, याबाबत अजितदादा गटाचे नेते आशावादी आहेत. शिवसेनेतील फुटीवरील निकालाने आम्ही निश्चिंत आहोत, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाच्या एका नेत्याने व्यक्त केली.

## संजय राऊत-आदित्य ठाकरें विरोधात हक्कभंग प्रस्ताव आणणार, प्रक्रिया सुरु; शिंदे गट आक्रमक

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

बहुमताच्या आधारावर शिवसेना ही एकनाथ शिंदे यांचीच आहे. दोन्ही गटांच्या व्हिपमध्ये कारवाईबाबत कोणतीही ठोस नोंद नसल्याने दोन्ही गटांच्या आमदारांना अपात्र ठरविता येत नसल्याचा महत्त्वपूर्ण निकाल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिला. आमदार अपात्रता प्रकरणाच्या निकालानंतर ठाकरे गट आक्रमक झाला. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सडकून टीका केली. आदित्य ठाकरे यांनीही प्रतिक्रिया देताना हल्लाबोल केला. शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी प्रत्युत्तर दिले. यातच आता संजय राऊत आणि आदित्य ठाकरे यांच्या विरोधात



हक्कभंग प्रस्ताव आणणार असून, याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती शिंदे गटातील नेत्यांनी दिली.

आमदार अपात्रता प्रकरणी आलेल्या निकालानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी असंसदीय भाषेत वक्तव्य केले. त्यांच्या विरोधात हक्कभंग आणण्यासाठी आमची प्रक्रिया सुरू झाली आहे, अशी माहिती शिवसेना शिंदे गटाचे उत्पादन शुल्कमंत्री मंत्री शंभुराज देसाई यांनी दिली. आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल विधानसभा अध्यक्षांनी कायद्याच्या चौकटीत राहून दिला, असे शंभुराज देसाई यांनी सांगितले.

**तिथे राऊतांनी लोकशाहीला तिलांजली वाहिली नाही का?**

आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल हा लोकशाहीच्या इतिहासातला हा काळा दिवस आहे, अशी टीका संजय राऊत यांनी केली होती. यावर बोलताना, निवडणुकीत ज्याच्यासोबत मते मागितली त्यांच्याच विरोधात सरकार बनवले ही लोकशाही आहे का, तिथे राऊतांनी लोकशाहीला तिलांजली वाहिली नाही का, अशी विचारणा शंभुराज देसाईंनी केली.

दरम्यान, आमदार अपात्रता प्रकरणचा निकाल संपूर्ण न्यायालयीन प्रक्रिया पार पाडून देण्यात आलेला आहे. आमदारांच्या अपात्रतेची मागणी कशी चुकीची हे अध्यक्षांनी सांगितले. आम्ही शिवसेना सोडलेली नाही, दुसऱ्या गटात गेलो नाही. नैसर्गिक युतीत निवडून आलो असताना उद्धव ठाकरेंच्या भूमिकेमुळे ज्यांच्या विरोधात निवडणूक लढवली त्यांच्यासोबत इच्छेविरोधात सरकारमध्ये सहभागी झालो. सरकार स्थापन करताना दोन-तीन हॉटेलमध्ये आम्हाला ठेवले. त्यावेळी पक्ष प्रमुखांकडे भाजप शिवसेनेचे सरकार असले पाहिजे हे वारंवार म्हणत होतो. जर मॅचफिक्सिंग असती तर १४ आमदारही अपात्र ठरवले गेले असते. ठाकरे गटाने न्यायालयात जावे. आम्ही न्यायालयात आमची बाजू मांडू, असे शंभुराज देसाईंनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

## विनापरवानगी रॅली काढून वाहतूक कोंडी करणाऱ्या केदारांवर गुन्हा दाखल

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

जामीन मिळाल्यानंतर कारागृहातून बाहेर येताच पोलिसांच्या परवानगीशिवाय रॅली काढून शक्तिप्रदर्शन करीत वाहतुकीत अडथळा आणल्याप्रकरणी माजी मंत्री सुनील केदार आणि त्यांच्या समर्थकांवर बुधवारी रात्री धंतोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्याआधारे पोलिस केदारांचा जामीन रद्द करण्याची तयारी करीत आहेत.

केदारांसह पोलिसांनी जि.प.चे माजी उपाध्यक्ष मनोहर कुंभारे, रवींद्र चिखले, जि.प. उपाध्यक्ष कुंदा राऊत, जि. प. सभापती अवंतिका लेकुरवाळे, अनिल राय, संजय मेश्राम आणि विष्णू कोकड्डे यांच्यावरही गुन्हा दाखल केला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये १५० कोटींपेक्षा जास्त रकमेचा सरकारी रोखे खरेदी घोटाळा करणारे केदार यांना विविध कडक अटींसह हायकोर्टाने मंगळवारी जामीन मंजूर केला होता. बुधवारी दुपारी २ वाजताच्या सुमारास केदार कारागृहातून बाहेर पडले. यानंतर त्यांनी समर्थकांसह शहरात शक्तिप्रदर्शन केले.

## सरसंघचालक मोहन भागवत यांनाही प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे विशेष निमंत्रण

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

अवघ्या देशाचे लक्ष लागलेल्या अयोध्येतील प्रभू श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा २२ जानेवारीला होत आहे. अवघ्या काही दिवसांत गेल्या ३० वर्षांपासूनचे पाहिलेले रामभक्तांचे स्वप्न सत्यात उतरत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्याहस्ते रामललाची मंदिरात प्राणप्रतिष्ठा होईल. त्यासाठी, देशभरातील अनेक मान्यवरांना विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी तब्बल ११ हजार



व्हीआयपींना बोलावण्यात आले आहे. त्यामध्ये, राजकीय नेते, उद्योगपती, सेलिब्रिटी, क्रिकेटर्स आणि कारसेवकांचा समावेश आहे. आता, सरसंघचालक मोहन भागवत यांनाही विशेष निमंत्रण देण्यात आलं आहे.

राम मंदिर बांधकाम समितीचे प्रमुख न्रीपेंद्र मिश्रा आणि विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष अलोक कुमार यांनी नागपूर येथे जाऊन सरसंघचालक मोहन भागवत यांनी भेट घेतली. यावेळी, त्यांनी सरसंघचालकांना निमंत्रण पत्रिका देत, प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आग्रहाचे निमंत्रण दिले. त्यामुळे, आता सरसंघचालकही राम मंदिर सोहळ्यासाठी अयोध्येला जाणार असल्याचे स्पष्ट होत आहे. दरम्यान, राम मंदिर सोहळ्याचं निमंत्रण देण्याचं काम अंतिम टप्प्यात असून काँग्रेसने या सोहळ्याचं निमंत्रण नाकारलं आहे. त्यावरुन, भाजपा नेत्यांनी काँग्रेसवर निशाणा साधला आहे.

**भाजपाचा काँग्रेसवर निशाणा**

अयोध्येत होणाऱ्या श्रीराम मंदिराचे उद्घाटन आणि रामललाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावर काँग्रेसने बहिष्कार टाकला आहे. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी गुरुवारी (११ जानेवारी) काँग्रेसने बहिष्कार टाकलेल्या सर्व कार्यक्रमांची यादीच वाचली. त्रिवेदी म्हणाले की, 'काँग्रेसवाले नेहमी नकारात्मक राजकारण करतात आणि प्रत्येक गोष्टीवर बहिष्कार टाकतात. त्यामुळेच देशातील जनतेनेही काँग्रेसवर बहिष्कार टाकला आहे. भारताचा इतिहास पाहिला तर काँग्रेसने प्रत्येक चांगल्या गोष्टींवर बहिष्कार टाककला आहे.

## मराठा आरक्षणासाठी १५ जानेवारीपासून सर्वेक्षण; पुढील कामकाज होणार मुंबईतून

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी घरोघरी करण्यात येणारे सर्वेक्षण १५ जानेवारीनंतर सुरू होणार आहे. आठवडाभरात हे सर्वेक्षण पूर्ण करून त्यानंतर आलेल्या माहितीचे वर्गीकरण व त्यातील दुरुस्ती सात दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर अहवालाचे लेखन आठवडाभरात पूर्ण करून त्याचा अहवाल राज्य सरकारला सादर करण्याचा राज्य मागास वर्ग आयोगाचा मानस आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाच्या मुंबईत बुधवारी झालेल्या बैठकीत यासंदर्भात आढावा घेण्यात आला. यावेळी आयोगाचे अध्यक्ष व सर्व सदस्य उपस्थित होते. आढावा बैठकीत सर्वेक्षणासाठी तयार करण्यात येत असलेले सॉफ्टवेअर अजूनही तयार झाले नसल्याचे उघड झाले. त्यानंतर आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांनी गोखले इन्स्टिट्यूटच्या संबंधितांशी ऑनलाइन चर्चा केली. हे सॉफ्टवेअर शुक्रवारपर्यंत तयार होणार असल्याची माहिती संस्थेकडून देण्यात आली.

**५० टक्के मानधन**

सॉफ्टवेअर टेस्टिंगचे काम पूर्ण झाल्यानंतर एक दिवसात राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नेमण्यात आलेल्या प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात येऊन तातडीने सर्वेक्षणास सुरुवात करण्यात येणार आहे. यासाठी कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची संख्या संबंधित जिल्हाधिकारी ठरविणार आहेत. आयोगाने या कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या मानधनासंदर्भात त्यांच्या मूळ वेतनाच्या ५० टक्के मानधन देण्याचे ठरविले आहे.

**पुढील कामकाज होणार मुंबईतून**

आरक्षणासंदर्भात सरकारने राज्य मागासवर्ग आयोगाला निर्देश दिलेले आहेत. आयोगाचे कार्यालय हे पुण्यात कार्यरत असून मराठा आरक्षणासंदर्भातील निर्णय होईपर्यंत आयोगाचे कार्यालय मुंबईतील नरिमन पॉईंट येथे हलविण्यात येणार आहे.

## संपादकीय ......

# सायबर विश्वात जरा जपूनच

ऑनलाईन सेवांच्या विस्तारामुळे आपले जीवन जितके सोपे झाले आहे, तितकेच सायबर गुन्ह्यांचा धोकाही वाढला आहे. खरेतर देशातील सायबर गुन्ह्यांवर आळा घालण्यास होत असलेला विलंब आणि लोकांमध्ये जागरूकता नसल्यामुळे गुन्हेगार आपल्या मनसुब्यांमध्ये यशस्वी होत आहेत. देशाची राजधानी दिल्ली, केंद्रशासित प्रदेश चंदिगड आणि हरियाणामध्ये सायबर गुन्ह्यांचे प्रमाण देशात सर्वाधिक आहे, ही बाब चिंताजनक आहे.

हरियाणातील मेवात हे सायबर गुन्हांच्या माध्यमातून खंडणीचे प्रमुख केंद्र म्हणून उदयास आले आहे. परिस्थिती इतकी चिंताजनक आहे, की गेल्या तीन वर्षांत आर्थिक फसवणूक करून १०,३९० कोटी रुपयांना गंडा घालण्यात आल्याचे एका अभ्यासातून समोर आले आहे. सायबर गुन्हेगारांच्या सुनियोजित टोळ्या लोकांची फसवणूक करून कष्टाने कमावलेल्या पेशावर हातोहात डल्ला मारत आहेत. अशिक्षित-सुशिक्षित सर्व स्तरातील लोक या लबाड गुन्हेगारांच्या सापळ्यात अडकत आहेत.

ही समस्या इतकी गुंतागुंतीची झाली आहे, की देशातील प्रति एक लाख लोकसंख्येमागे १२९ सायबर गुन्हे नोंदवले गेले आहेत. राजधानी दिल्लीत हा आकडा प्रतिलाख लोकसंख्येमागे ७५५, चंदिगडमध्ये ४३२ आणि हरियाणामध्ये ३८१ आहे. या ठिकाणी सायबर गुन्ह्यांचे प्रमाण अधिक होण्याचे एक कारण म्हणजे ऑनलाईन पर्यायांच्या जागरूकतेमुळे अधिक लोक या सेवा वापरत आहेत, मात्र, सायबर गुन्ह्याच्या मायावी दरोडेखोराच्या फसव्या खेल्याची माहिती नसल्याने ठोक पटकन गुन्हेगारांच्या जाळ्यात येतात.गुन्ह्यांचे स्वरूप पाहिल्यास २०२३ मध्ये, सर्व सायबर गुन्ह्यांपैकी ३८ टक्के गुंतवणुकीशी संबंधित फसवणूक होते. यानंतर ग्राहक सेवेच्या नावाखाली आवश्यक माहिती घेऊन किंवा केवायसी पूर्ण झाल्याची खोटी माहिती देऊन फसवणूक केल्याची प्रकरणे उघडकीस आली. एवढेच नाही तर सेक्सटॉर्शनच्या माध्यमातून पैसे उकळल्याची अनेक प्रकरणेही उघडकीस आली आहेत. यामध्ये व्हिडीओ कॉलद्वारे अश्लील दृश्यांसह त्यांची छायाचित्रे जोडून बदनामी करण्याची धमकी देऊन पैसे उकळले जातात. यामुळे सायबरतज्ज्ञ अज्ञात व्हिडीओ कॉलला प्रतिसाद न देण्याचा सल्ला देत आहेत, असा कॉल उचलल्यास लैगिक शोषणाचे बळी ठरण्याचा धोका आहे.

२०२२ ते २०२३ या एक वर्षाच्या काळात देशात सायबर गुन्ह्यांमध्ये ६१ टक्के वाढ होणे, हा एक गंभीर इशारा आहे. २०१९ मध्ये नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल सुरू झाल्यानंतर लोकांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे सायबर गुन्ह्यांमध्ये पैसे गमावलेल्या ४.३ लाख नागरिकांचे झालेल्या नुकसानीपैकी १,१२७ कोटी रुपये वसूल करता आले. आधुनिक काळात अद्ययावत तंत्रज्ञानाच्या मदतीने जगभरात मोठी क्रांती झाली आहे. त्याचा वापर चांगल्या कामाबरोबरच वाईट कामासाठी केला जातो. लोक सायबर गुन्हेगारांच्या आमिषाला बळी पडतात, हे खूपच चिंताजनक आहे.

# भाषेबाबत उदासीनता का?

येत्या वर्षांपासून पदवी स्तरावर नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारण्याचा निर्णय महाराष्ट्र शाशनाने घेतला आहे. त्यासाठी अभ्यासक्रम ठरवणे, क्रेडिट्स आणि मेजर व मायनर विषय, परीक्षा पद्धती वगैरे बाबी निश्चित करणे इत्यादी गोष्टींची तयारी सुरु आहे. धोरणाच्या निर्देशानुसार सर्व लागूही होईल. मात्र...?

कला भाखा मोडली, तर विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना भाषा या विषयाचा अभ्यास आवश्यक आहे का? हा प्रश्न नव्यानेच समोर आला. याआधी असा प्रश्न कधीही नव्हता. कारण आतापर्यंत 'भाषा' मग ती कुठलीही असो, तिच्याशिवाय अध्ययन-अध्यापन अशक्य आहे. तिचा अभ्यास विद्यार्थी कोणत्याही शाखेचा असो करायलाच हवा. मला वाटतं हा एकच तर्क भाषेचा अभ्यास करावा यासाठी पुरेसा आहे तरी, ज्यांना 'भाषा' का शिकावी असा प्रश्न पडतो त्याचेच उत्तर देण्यासाठी हा लेख प्रपंच.

पहिला मुद्दा म्हणजे ज्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचे ठरले आहे त्याच धोरणात भायेला अनन्य साधारण महत्व आहे. भारत सरकारच्या संकेतस्थळावर उपलब्ध राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या आराखड्यातील (पान क्र. ६) धोरण तत्वांतर्गत स्पष्ट उल्लेख आहे की, अध्ययनात व अध्यापनात बहुभाषिकत्व आणि भाषा शक्ती यांना प्रोत्साहन देणे', मुळातच जे धोरण असे विधान करते त्याचीच अंमलबजावणी करतांना 'भाषा' विषयांना डावलणे म्हणजे राष्ट्रीय धोरणाच्या विरुद्ध जाणे होय.

दुसरा मुद्दा म्हणजे, शैक्षणिक धोरणाच्या आराखड्यात सहाव्या पान क्रमांकावर म्हटले आहे की, संवाद, सहकार्य, जीवन मूल्ये, नैतिकता, सहृदयता, आणि इतर मूल्ये यांचा विचार करण्यात येईल. भाषा आणि साहित्य सोडून विज्ञान व वाणिज्य शाखेतील ईतर मुख्य विषयांतून या मूल्यांचे संवर्धन कसे होईल? त्यासाठी वेगळे अभ्यासक्रम तयार करावे लागतील. त्यापेक्षा भाषा विषय नैसर्गिकरित्या प्रस्तुत मुद्यांना आपल्यात अंतर्भूत करतो. एक सशक्त आणि आधीच अस्तित्वात असलेला पर्याय उपलब्ध असल्यावर तो वापरायला काय हरकत असावी?

तिसरा मुद्दा, जो विज्ञान, तंत्रज्ञान आणि वाणिज्य शाखेत काम करणारा प्रत्येक सुज्ञ व विचारी व्यक्ती नाकारू शकत नाही. एखादा विद्यार्थी भाषा कौशल्याशिवाय त्याने निवडलेल्या क्षेत्रात यशस्वी होऊ शकतो? जर तसे असेल तर सर्व विद्यापीठांमध्ये 'संवाद कौशल्य' अभ्यासक्रम या न त्या पद्धतीने राबविल्या जातात. याचा अर्थ 'संवाद कौशल्य' अर्थात 'भाषा कौशल्य' किती अत्यावश्यक आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या आराखड्यातील पान क्रमांक ४८ वर स्पष्ट नमूद केले आहे की 'बहूविद्याशाखीय आणि अधिक सर्वांगीण' शिक्षणाच्या दिशेने मार्गक्रमण करेल. अशावेळी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना 'भाषा' विषय निवडण्याचा पर्याय उपलब्ध न करून देणे हि त्या धोरणाशी प्रतारणा नाही का?

वाणिज्य असो किंवा विज्ञान शाखेतील विद्यार्थी असो त्यांना इतर शाखेतील विषय 'मायनर विषय म्हणून निवडण्यात येईल असे आश्वासन नवीन शैक्षणिक धोरण देत होते. विज्ञान शाखेतील विद्यार्थी संगीत' विषय मुद्धा निवडू शकतील असा गाजावाजा धोरण निर्मात्यांनी केला होता. असे असेल तर वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे 'भाषा' विषय निवडण्याचे स्वातंत्र्य डावलण्यात आल्यास ते राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या विरुद्ध नसेल का?

सर्व विद्याशाखांमध्ये लेखी परीक्षा आणि तोंडी परीक्षा होते. त्याशिवाय त्यांचे मूल्यमापन होऊ शकेल अशी सक्षम पर्यायी परीक्षा पद्धतीचा अजूनपर्यंत तरी शोध लागला नाही. या परीक्षेमध्ये भाषेचाच वापर करून प्राप्त केलेल्या ज्ञानाला लिखित वा तोंडी स्वरूपात मांडावे लागते. अशावेळी विद्यार्थी वाणिज्य शाखेचा आहे म्हणून त्याने सदोष भाषेत मांडणी केल्यास चालेल का? उत्तर नाही असेल, तर त्याला भाषा शिकवणे गरजेचे आहे. म्हणून त्याच्यासाठी 'भाषा' विषय अभ्यासक्रमात असावा असे म्हणणे चूक होईल का? याच धोरणात पान क्रमांक ५२ वर असे म्हटले आहे कि आपल्या शिक्षण पाद्धतीचे आंतरराष्ट्रीयकरण करणे गरजेचे आहे. असे असेल तर बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना स्थानिक भाषा वा इंग्रजी भाषा शिकवावी लागणार नाही का? त्यासाठीही भाषा विषय अभ्यासक्रमात नसावा का?

सर्व विद्याशाखा संशोधनाला

**प्रा. ज्ञानेश्वर गटकर**
**यवतमाळ**



महत्व देत आहेत. योग्यच आहे. मात्र त्यांनी केलेले संशोधन हे सदोष भाषेत असेल तर त्या संशोधनाची विश्वासहार्यता राहील का? निदान त्यासाठी तरी त्याला भाषेचे मूलभूत ज्ञान असणे गरजेचे आहे. निदान त्याला पदवी शिक्षण घेत असतांना ती भाषा शिकण्याची किमान संधी तरी असावी,

शैक्षणिक धोरणाच्या आराखड्यातील पान क्रमांक ७१ वरील मुद्दा क्रमांक २२.१ ते २२.२० पर्यंत फक्त भारतीय भाषा आणि त्यानुषंगे भाषिक अध्ययनाचे, कला आणि संस्कृतीचे महत्व अधोरेखित केले आहे. वाणिज्य वा विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना याची आवश्यकता नाही का? कि फक्त ते कला शाखेतीलच विद्याच्यांसाठी आहे. असे असेल तर नवीन शैक्षणिक धोरण बहुविद्याशाखीय आणि आंतरविद्याशाखीय आहे असे म्हणणे आपण बंद करायला हवे.

इतर बरेच मुद्दे नवीन शैक्षणिक धोरणाने भाषेला दिलेल्या महत्वाचे स्पष्टीकरण देतात. तरी भाषेचे महत्व दुय्यम समजणाऱ्या वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील तज्ज्ञांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अधीन राहून उच शिक्षणात अभ्यासक्रम ठरवणे व विद्यार्थ्यांना निवडीचे स्वातंत्र्य देणे बंधनकारक नाही का? उलट ती शिकणे हि अनिवार्यता असायला हवी.

आय आय टी सारख्या संस्था ज्या तंत्रज्ञानाला पूर्णतः वाहिलेल्या आहेत त्या संस्था सुद्धा भाषा आणि साहित्य हे विषय आपल्या अभ्यासक्रमात समाविष्ट करतात, त्याचे कारण 'भाषा' हे फक्त कौशल्य नसून ती एक 'सॉफ्ट पॉवर' आहे. ती विचाराच्या अभिव्यक्तीचे सर्वात प्रभावी साधन आहे. साधनसुचितेबद्दल इतके आग्रही असलेले आपण भाषा या संवाद साधना बाबत मात्र इतके उदासीन का की वाणिज्य वा विज्ञानाच्या विध्यार्थ्यांना त्याच्या अभ्यासाला नाही म्हणतो आहोत.

# 'सरकारच्या स्थैर्याबाबत शंका राहण्याचं कारण नाही

# देवेंद्र फडणवीसांचा ठाकरेंना टोला

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई :**विधानसभा अध्यक्षांच्या आदेशानंतर कुणाच्या मनात सरकारच्या स्थैर्याबाबत शंका राहण्याचं कारण नाही, या निकालानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ठाकरेंना टोला दिला आहे तर सरकार आपला कार्यकाळ पूर्ण करेल, असे वक्तव्य देवेंद्र फडणवीसांनी म्हणाले. आमदार अपात्रता प्रकरणी आलेल्या निकालानंतर फडणवीसांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्त्वात राज्यात सरकार स्थापन करताना संवैधानिक आणि कायदेशीर प्रक्रियेचे संपूर्णत: पालन करण्यात आले होते. त्यामुळेच हे सरकार मजबूत आणि भक्कम आहे, असे आम्ही प्रारंभीपासूनच सांगत होतो. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा आपल्या आदेशात म्हटले आहे. सरकार बरखास्त करण्याचा कुठलाही आदेश देण्याची गरज नाही, असे स्पष्ट केले होते.

काही लोक मुद्दाम आणि वारंवार सरकारबाबत गैरसमज पसरवून राज्यातील वातावरण अस्थिर करण्याचा प्रयत्न करत होते. आज विधानसभा अध्यक्षांनी विविध नियमांचा दाखला घेत, जो आदेश आज दिला. त्यानंतर आतातरी कुणाच्या मनात सरकारच्या स्थैर्याबाबत शंका राहण्याचे कारण नाही. मी पुन्हा सांगतो, हे सरकार आपला कार्यकाळ पूर्ण करणार आहे, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीसांनी दिला.

## हुकुमशाहीनं पक्ष चालवणाऱ्यांना मोठा झटका: मुख्यमंत्री

सत्तेत आल्यापासून कायम एकनाथ शिंदेंचे मुख्यमंत्रीपद जाणार असे सारखे बोलत होते. परंतु अजूनही मी सत्तेत कायम आहे. हुकुमशाहीनं पक्ष चालवणाऱ्यांना या निर्णयामुळे मोठा झटका मिळाला आहे. हा लोकशाहीचा विजय आहे. महाराष्ट्रातील तमाम जनतेचा विजय आहे. आजचा जो निर्णय झालेला आहे तो प्रत्येक ठिकाणी एक माइल स्टोन ठरणार आहे. हा निर्णय जनतेच्या दृष्टीने खूप योग्य आहे, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

## ठाकरे प्रायव्हेट कंपनीप्रमाणे पक्ष चालवत होते : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

आमदार अपात्रतेच्या निकालाचं स्वागत करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार टीका केली आहे. हा निकाल लोकशाहीचा विजय असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. तर ठाकरे प्रायव्हेट कंपनीप्रमाणे पक्ष चालवत होते असा आरोपही एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

# हुकुमशाहीनं पक्ष चालवणाऱ्यांना या निर्णयामुळे मोठा फटका

## मुंबईत आल्यानंतर मुख्यमंत्र्यांचा ठाकरेंवर निशाणा

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक मुंबई :** – विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी दिलेला निर्णय म्हणजे सत्याचा आणि लोकशाहीचा विजय आहे. अशी प्रतिक्रिया मुंबईत दाखल झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिली आहे. हुकुमशाहीनं पक्ष चालवणाऱ्यांना या निर्णयामुळे मोठा झटका बसला, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी ठाकरेंवर निशाणा साधला आहे. ते रात्री मुंबईत माध्यमांशी बोलत होते.

मुख्यमंत्री म्हणाले, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी दिलेला आजचा निर्णय सगळ्यांचा आहे. सत्तेत आल्यापासून कायम एकनाथ शिंदेंचे मुख्यमंत्रीपद जाणार असे सारखे बोलत होते. परंतु अजूनही मी सत्तेत कायम आहे. हुकुमशाहीनं पक्ष चालवणाऱ्यांना या निर्णयामुळे मोठा झटका मिळाला आहे. हा लोकशाहीचा विजय आहे. महाराष्ट्रातील तमाम जनतेचा विजय आहे. आजचा जो निर्णय झालेला आहे तो प्रत्येक ठिकाणी एक माइल स्टोन ठरणार आहे. हा निर्णय जनतेच्या दृष्टीने खूप योग्य आहे.

**हुकुमशाहीनं पक्ष चालवणाऱ्यांना या निर्णयामुळे मोठा झटका : मुख्यमंत्री**

आमदार अपात्रचा प्रकरणावरून विरोधकांनी केलेल्या टीकेवर एकनाथ शिंदे म्हणाले, विरोधक कोणालाच मानत नाही. निवडणूक आयोग, न्यायालयला देखील मानत नाहीत. ते सर्व संस्थांपेक्षा स्वतःला मोठे मानतात. नेहमी स्वतःला मोठे म्हणतात. सुप्रीम कोर्टाला देखील अनेक सल्ले देण्याचे त्यांनी काम केलं म्हणून त्यांना आज मोठी चपराक मिळाली आहे. २०१९ मध्ये त्यांनी जनतेसोबत बेइमानी केली त्यांना हा मोठा चपराक आहे, असल्याची टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी केली आहे.




**प्रभू श्रीरामाने २२ जानेवारी अगोदरचं आशीर्वाद दिला : मुख्यमंत्री**– २०१९ साली बाळासाहेबांचे विचार विकले आणि सत्तेसाठी केले. बाळासाहेबांनी काँग्रेसला कधी जवळ गेले नाही. सत्तेसाठी यांनी काँग्रेसला जवळ केले आणि सरकार स्थापन केला. बाळासाहेबांच्या विचाराचा वारसा चालवणाऱ्या खऱ्या शिवसेनाला आज न्याय मिळाला आहे. प्रभू श्रीरामाने २२ जानेवारीच्या अगोदर आशीर्वाद दिला आहे. प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याच्या आधी निर्णय आल्यने सर्व जनतेला न्याय मिळाला आहे. आगामी लोकसभा निवडणुकांमध्ये ४५ हून अधिक जागा आम्ही जिंकून येणार आहेत, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.




## लिव्हर वाढणे हे गंभीर आजाराचं लक्षण; चुकूनही दुर्लक्ष करू नका

बिघडलेली जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या सवयींमुळे अनेकदा लोकांना यकृत वाढण्याची समस्या भेडसावते. मात्र, या संदर्भात अद्यापही लोकांना पुरेशी माहिती नाही. त्यामुळे, या ठिकाणी आपण यकृत (लिव्हर) मोठं होण्याचा आजार नेमका काय आहे? आणि यकृत वाढल्यामुळे कोणत्या आजाराचा धोका निर्माण होतो? या संदर्भात अधिक माहिती जाणून घेणार आहोत.

यकृत हा शरीराचा महत्त्वाचा भाग आहे. आपलं यकृत जर बरोबर असेल तर आपली पचनसंस्था निरोगी राहते. बहुतेक लोकांमध्ये, चुकीचा आहार घेतल्याने आणि दूषित पाणी प्यायल्याने यकृतावर परिणाम होतो. काही वेळा मद्यपान केल्यानेही यकृत खराब होते. हिपॅटायटीस बी हा देखील यकृताचा असाच गंभीर आजार आहे. प्रतिबंध आणि वेळेवर उपचारांसाठी फक्त ही लक्षणे ओळखणे आवश्यक आहे. यकृताच्या या ६ लक्षणांकडे चुकूनही दुर्लक्ष करू नका.

**सांधेदुखीचा त्रास होऊ शकतो**

यकृताची लागण होताच हिपॅटायटीस हा एक सामान्य आजार आहे. यामध्ये यकृताला सूज येते. तसेच, या आजारात सौम्य तापासारखी लक्षणे दिसू शकतात. तापमान वाढीबरोबरच थकवा, डोकेदुखी आणि सांधेदुखीचाही त्रास होऊ शकतो. मात्र, एक गोष्ट लक्षात घ्या की, ताप इतर अनेक कारणांमुळे येऊ शकतो याचा अर्थ हिपॅटायटीस बी असा होत नाही.

**लघवीचा रंग गडद पिवळा असू शकतो**

डॉक्टरांचे म्हणणे आहे की, हिपॅटायटीस बी ची लागण झालेल्या लोकांच्या लघवीचा रंग गडद पिवळा असू शकतो. अशी लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

**उलट्या होणे आणि भूक न लागणे**– हिपॅटायटीस बी ची लागण झालेले लोकांच्या यकृतामध्ये सूज दिसून येते. यकृत नीट कार्य करू शकत नाही. यामुळे गॅस्ट्रोइंटेस्टाइनल लक्षणे दिसू शकतात. यामध्ये उलट्या होणे, भूक न लागणे, चक्कर येणे यांचा समावेश होतो.



**शरीराचा रंग पिवळा होऊ शकतो**

जळजळ आणि इतर संक्रमणांमुळे बिलीरुबिन वाढते. त्यामुळे कावीळ होते. बिलीरुबिन हे रक्तातील एक रसायन आहे ज्यामुळे त्वचा पिवळी होऊ शकते. त्यामुळे डोळे आणि त्वचा पिवळी दिसू लागते. हिपॅटायटीस बी आणि कावीळ यांच्यातील फरक ओळखण्यासाठी तुम्ही टेस्ट करू शकता.

**वजन कमी होणे, पोटदुखीचा त्रास**

यकृताला जास्त संसर्ग झाल्यास त्याचा परिणाम पोटावर देखील दिसतो. जर तुमच्या लिव्हरवर परिणाम झाला तर तुम्हाला भूक लागत नाही. वजन लवकर कमी होतं. तसेच, पोटात देखील दुखू लागतं. अशी लक्षणं दिसल्यास वेळीच सावध व्हा. आणि डॉक्टरांशी संपर्क साधा.

# सत्याला सोय हवी असते, तेव्हाच पत्रकारिता सुरळीत होते-शैलेश धुंदी

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**– एखाद्या व्यक्तीच्या संदर्भात सत्य मांडताना ते त्याच्या सोयीने मांडावे लागते, तसे झाले नाही, तर परिणाम भोगावे लागतात. तशी पत्रकारिता आज अस्तित्वात असल्याचे दिसून येते; परंतु काही पत्रकार आजही त्याला अपवाद आहेत. वृत्तपत्रवाचक हा प्रहरी असला पाहिजे, म्हणजे पत्रकाराला त्याच्या चुका निदर्शनात येतील आणि त्या दुरुस्त करून घेता येतील. पत्रकारिता हे सतीचे वाण असले, तरी पत्रकाराने आपल्या ध्येयापासून कधीच परावृत्त होऊ नये, असे प्रतिपादन महाराष्ट्र टाइम्सचे अमरावती जिल्हा प्रतिनिधी व दैनिक हिंदुस्थानचे प्रतिनिधी शैलेश धुंदी यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत एम. ए आजीवन अध्ययन व विस्तार अभ्यासक्रमाच्यावतीने मराठी पत्रकार दिननिमित्ताने आयोजित व्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते.

शैलेश धुंदी पुढे म्हणाले, पत्रकाराने समाजाचे प्रश्न सोडवितांना स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा समाजमनावर उमटविला पाहिजे. पत्रकारिता जीवनातील अनुभव त्यांनी उपस्थितांसमोर कथन केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यापीठ




गीत ऐकतांना आपण केलेल्या कार्याची इतिकर्तव्यता पूर्ण झाल्याचे समाधान वाटते असेही ते म्हणाले. अमरावती शहरात विविध घटनांचे वृत्तांकन करतांना आलेले अनुभव, आणि अंतकरणातील संवेदनशीलता जीवंत असल्यामुळे त्या विषयावरील वृत्त बिटवीन द लाईन झाली, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ. मंजुषा बारबुध्दे यांनी पत्रकारितेची धुंदी चढलेले पत्रकार म्हणजे शैलेश धुंदी अशी नर्मविनोदात्मक कोटी करत शैलेश धुंदी यांच्या कार्याचा गौरव केला. विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संत गाडगे बाबा यांना अभिवादन करून विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावर्षीचा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल शैलेश धुंदी यांचा डॉ.वैभव मस्के यांनी पुस्तक, पुष्प भेट देऊन सत्कार केला. प्रास्ताविक डॉ. अंबादास घुले, संचालन डॉ. मेघा कनाटे, तर आभार प्रा. अलका ब्राम्हणकर यांनी मानले. कार्यक्रमाला विभागातील सर्व शिक्षक, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# शहरात ट्रक, स्कूल बस, ऑटोचा बंद, ठिकठिकाणी निदर्शने

## विभागीय आयुक्तांना निवेदन



**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** केंद्र सरकारने मंजूर केलेल्या हिट अँन्ड रन कायदा कायमस्वरूपी रद्द करण्याच्या मागणीसाठी बुधवारी अमरावती जिल्हा वाहन चालक कृती समितीने बंद पुकारून निदर्शने केली. राज्यव्यापी बंदा अंतर्गत हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. उपरोक्त कायद्याच्या विरोधत आठ दिवसांपूर्वी खाजगी वाहन चालकांनी देशव्यापी बंद पुकारला होता. त्यानंतर केंद्र सरकारने सदर कायद्याची अंमलबजावणी तुर्तास होणार नाही, अशी घोषणा केली होती. त्यानंतर बंद मागे घेण्यात आला होता. पण, आता कायद्याची अंमलबजावणी होणार नाही, या संदर्भात सरकारकडून कोणताही लेखी दस्तावेज मिळालेला नाही, असे कारण समोर करून राज्यातल्या खाजगी वाहन चालकांनी बुधवार पासून बंद पुकारला. त्यात अमरावतीच्या कृती समितीने सहभाग घेऊन बंद पाळला.

या आंदोलनाच्या समर्थनात कृती समितीच्या पदाधिकार्यांनी शहरातून एक रॅली काढली. ही रॅली इर्विन चौकातून सुरू होऊन मालविय चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, रेल्वे स्टेशन चौक मार्गे पुन्हा इर्विन चौकात आली. प्रत्येक चौकात वाहन चालकांनी निदर्शने केली. त्यानंतर कृती समितीच्या पदाधिकार्यांनी विभागीय आयुक्तांना मागणीचे निवेदन दिले. या बंदमध्ये ट्रक, स्कूल बस व काही प्रमाणात ऑटो चालक सहभागी झाले होते. ट्रक व ऑटो बंदचा प्रभाव पहिल्या दिवशी दिसला नाही. बंदच्या पृष्ठभूमिवर एसटी बसला पोलिसांनी संरक्षण दिले होते. शहरात आवश्यक साहित्य घेऊन येणारे ट्रक बुधवारी कमी प्रणात शहरात आल्याची माहिती मिळाली.

### विद्यार्थांची झाली गैरसोय

स्कूल बस चालकांनी या बंदमध्ये सहभाग घेतल्याने बुधवारी शहरातल्या सर्व शाळांच्या बस बंद होत्या. त्यामुळे दुर अंतरावर शाळा असलेल्या विद्यार्थांची चांगलीच गैरसोय झाली. अनेक विद्यार्थी शाळेतच गेले नाही. बस चालकांचा हा बंद बेमुदत असल्याचे सांगण्यात आले.

# अचलपुर व परवाड्यात ऑटोचा सक्तीचा बंद

## शालेय विद्यार्थी व नागरिकांना त्रास

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** केंद्र सरकारच्या नवीन परिवहन कायद्याला तात्पुरती स्थगिती दिल्यानंरही बुधवारी अचलपूर परतवाडा या जुळ्या शहरातील काही ऑटो चालकांनी अवैधपणे बंद पुकारून ऑटो रिक्षा सक्तीने बंद ठेवला. त्यामुळे विद्यार्थांची व नागरिकांची गैरसोय झाली. पोलिसांनी हस्तक्षेप केल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.



परतवाडा - अचलपुर मार्गावर असलेल्या तहसील टी पॉईंटवर सकाळी दहाच्या सुमारास शहरातील काही ऑटो रिक्षा चालकांनी बंद पुकारला. तहसील कार्यालयासमोरच प्रवासी ऑटोंना थांबवून चालकाला ते तंबी देत होते.प्रवाशांना ऑटोतून उतरवून ऑटो बंद करा. आमच्या आंदोलना सहभागी व्हा, अशी दमदाटी करीत होते. दरम्यान एका महिला प्रवाशाने भाजपा नेते अभय माथने यांना फोन करत तहसील कार्यालयासमोरची माहिती दिली. माथने यांनी लगेच पोलिसांना सांगितले.

पोलिस तात्काळ घटनास्थळावर दाखल झाले. ठाणेदारांनी ऑटो चालकांना जबरदस्ती करू नका, इथून निघून जा, अशी तंबी देत वाहतूक सुरळीत केली. घडलेला प्रकार हा पूर्व नियोजीत होता अशी चर्चा शहरात आहे. बंदची अफवा शहरात पसरवल्या गेली, असेही सांगण्यात येत आहे. ऑटो चालकाच्या कोणत्याच युनीयने बंद पुकारलेला नव्हता. काही टवाळखोरांनी अचानक रस्त्यावर थांबवून ऑटो चालकांना धमकावणे चुकीची असल्याचे भाजपा नेते अभय माथने यांनी सांगितले. मला सदर घटनेची माहीती मिळताच तहसील कार्यालयाजवळ पोहचलो. वाहतूक सुरळीत केल्याचे ठाणेदार सुरेंद्र बेलखेडे यांनी सांगितले.

# राजकारण टिकेचे नाही, विकासाचे करावे

## खासदार नवनीत यांचा विरोधकांना टोला

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर** – विरोधकांनी विनाकारण टीका करण्याचा जणू काही विडा उचलल्या गत राजकारण सुरू केले आहे. विकासकामांना तिलांजली देत केवळ वायफळ टिका सर्वत्र सुरू असतात. विरोधकांनी टिकेचे राजकारण न करता विकासाचे राजकारण करावे, असे आवाहन खा. नवनीत राणा यांनी



विरोधकांना केले.तालुक्यातील लेहगाव रेल्वे येथे खासदार निधी मधून विविध विकासकामांचा भूमिपूजन सोहळा झाला. त्यावेळी त्या बोलत होत्या. बैलबंडीत बसून त्यांचे गावात आगमन झाले. विशेष म्हणजे यावेळी त्यांच्या समवेत रिपाईचे सरचिटणीस डॉ. राजेंद्र गवई होते. कार्यक्रमात विष्णू कुराडे, अनिल गवई, भाजपचे बाळासाहेब वानखेडे, माजी आमदार रमेश बुंदिले, गोपाल चंदन, अतुल गोळे, बाबाराव बरवट, मदनराव

### लेहगाव रेल्वे येथे विकासकामांचे भूमिपूजन

बायस्कर, लेहगावचे सरपंच प्रवीण डोंगरदिवे, पंजाबराव नागे, युवा स्वाभिमानचे अमोल कोरडे, किरण श्रीराव आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील प्रत्येक गावागावात विकासकामे होत आहे. पंतप्रधान मोदींनी संपूर्ण देशात विकासकामांना सर्वोच्च स्थानावर ठेवले असून जनतेला तेच अभिप्रेत आहे.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमाची यशस्वीपणे अंमलबजावणी करा - गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना

**दि११ विदर्भ प्रजासत्ताक धामणगाव रेल्वे** – शिक्षक, पालक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी, स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रेरणादायी वातावरण मिळावे यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियानाची यशस्वीपणे अंमलबजावणी करावी,असे प्रतिपादन पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे यांनी केले. धामणगाव पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या तालुक्यातील जिल्हा परिषद व नगर परिषद शाळांच्या मुख्याध्यापक सभेत गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे बोलत होते.यावेळी गटसमन्वयक धीरज जवळकार,शिक्षण विस्तार





अधिकारी साबीर खान,नारायण अतकरे,सुनील रोंघे, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेचे अधीक्षक अरुण चव्हाण,नगर परिषदेचे शिक्षण प्रशसान अधिकारी उमेश गोंडीक, केंद्र प्रमुख नरेश पाटील,डी.एस.राठोड,जगदीश शिरसाट,प्रफुल्ल डाफ, विषय साधन व्यक्ती शेषराव चव्हाण,कलेश कांबळे, ज्योती राऊत, वैशाली लिलव्हें,आय.ई.डी. विषय तज्ञ रविकिरण खवले प्रवीण ठाकरे, मनोज सिंगणापूरे, वैभव गवते, हेमंत कोटंबकर, वैशाली सोनपरोते व आदी उपस्थित होते. २०२०-२१ पासून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना पूर्णतः राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे. भौतिक सुविधांचे निर्माण, शैक्षणिक गुणवत्तेतील वाढ व प्रशासकीय सुधारणा अशी प्रमुख क्षेत्रे सदर योजनेसाठी निश्चित करण्यात आली आहेत. ही योजना शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसाठी राबविण्यात येते.शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेस पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाकरिता अनुक्रमे २१ लाख, ११ लाख व ७ लाख रुपये इतक्या रकमेचे पारितोषिक देण्यात येतील. अशाच प्रकारचे पारितोषिक इतर शाळांना अनुज्ञेय असेल. जिल्हास्तरीय मूल्यांकन समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्ष असतील, तर प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण विभागाचे प्राचार्य हे सदस्य आहेत. तालुकास्तरावर गटविकास अधिकारी अध्यक्ष असतील तर नगरपालिकेचे मुख्याधिकारी व गटशिक्षणाधिकारी सदस्य असतील. नवीन वर्षाच्या पहिल्या दिवसापासून हे अभियान सुरू झाले आहे. पुढील ४५ दिवस म्हणजेच १५ फेब्रुवारीपर्यंत हे अभियान चालणार आहे. या अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन या ४५ दिवसांत करणे आवश्यक राहील.मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियानाची यशस्वीपणे अंमलबजावणी करावी,असे पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे यांनी सभेत सांगितले.संचालन गटसमन्वयक धीरज जवळकार यांनी केले तर आभार विषय साधन व्यक्ती ज्योती राऊत यांनी मानले.

# अमरावतीत अभाविपचा खेलो भारत क्रीडा महोत्सव

## १५ जानेवारीला कुस्ती व मल्लखांबच्या स्पर्धा



**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व पटवावे म्हणून महोत्सवाच्यापूर्वी १२ जानेवारी स्वामी विकानंद जयंती राष्ट्रीय युवा दिनी अमरावती महानगरातून दुपारी ३ वाजता भव्य रॅली काढण्यात येईल. ही रॅली हव्याप्र मंडळातून सुरू होईल. १५ जानेवारीला विदर्भस्तरीय महिला व पुरुष गटासाठी कुस्ती स्पर्धा सहा वेगवेगळ्या वचन गट प्रकारात तर मल्लखांब स्पर्धा दोन वेगवेगळ्या गटात श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या प्रागंणामध्ये होईल. या क्रीडा महोत्सवाचे उदघाटन करण्यासाठी राष्ट्रमंडळ कुस्ती खेळामध्ये सुवर्ण पदक विजेत्या बबिता कुमारी फोगट व अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या प्रांत मंत्री पायल किनाके उपस्थित राहणार आहेत.

केंद्रीय क्रिडा मंत्री अनुराग ठाकूर व राज्याचे क्रिडा मंत्री संजय बनसोडे उपस्थित राहण्याची शक्यता आहे.विद्यार्थ्यांनी व क्रीडाप्रेमींनी या क्रीडा महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या प्रांत संयोजक रिया हिंडोजा व प्रा. संजय तिरथकर यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केले. यावेळी नचिकेत बांडाबुचे, रिया गुप्ते, अनुराग बालेकर, डॉ. श्याम मुंजे उपस्थित होते.

# धारणीत मोतीमाता नारी संमेलन

## मेळघाटातील विविध गावांतील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक धारणी–** देशातील महिला आपल्या परिवारांचे पालन पोषण आणि सुसंस्कृत करण्यास सक्षम असली तरी आता आधुनिक युगात महिलांनी देशाला संस्कारक्षम करण्याची गरज आहे. हे दुर्लभ कार्य नारीशक्तीच करू शकते हे मेळघाटातील मोतीमाता नारीशक्ती संमेलनामुळे शक्य वाटत आहे, असे प्रतिपादन मायबाई रेणुका देवी यांनी केले. त्या धारणी येथे आयोजित पाच तालुक्यातील मोतीमाता नारीशक्ती संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या.

धारणी येथील बालाजी मंगलम येथे आयोजित धारणी, चिखलदरा, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर आणि अचलपूर तालुक्यातील महिलांसाठी नारीशक्ती संमेलनाचे आयोजन रविवारीपार पडले. उद्घाटक म्हणून मायाबाई रेणुका देवी उपस्थित होत्या. मार्गदर्शक म्हणून राष्ट्रसेविका समितीच्या आरती तिवारी, मीरा कडबे, डॉ. निरुपमा देशपांडे, संमेलन पालक नीता कीटकरू, डॉ. भारती जावरकर, ॲड. रिम्मी देशमुख उपस्थित होत्या. संमेलनाच्या संयोजिका रेखा मावसकर आणि सहसंयोजीका जया खंडारे यांच्या मार्गदर्शनात झालेल्या कार्यक्रमाचे हजारोंच्या संख्येने आदिवासी महिलांनी भाग घेतला. हरीगोविंद छात्रवासाच्या स्थापनेपासून स्वयंपाक करणार्या शांता यादव यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.



बचत गटाच्या नरबंदीताई धांडे यांनी सुध्दा आपले मत व्यक्त केले. विश्व मांगल्य संघटनेच्या मंजुषा लोळे यांनी प्रचार प्रसाराचे कार्य केले.दुसर्या सत्रात निताताई किटकरू आणि अंतिम सत्रात डॉ. निरुपमा देशपांडे यांचे प्रबोधन झाले, संमेलनाचे प्रास्ताविक करताना नारी संमेलनाच्या उद्देश व महिलांना मार्गदर्शन रेखा मावसकर यांनी स्पष्ट केले. संचालन अपर्णा क्षीरसागर यांनी केले तर आभार प्रदर्शन जया खंडारे यांनी केले. यशस्वी करीता रेखा मावसकर, नीलम जोशी, स्मिता नालमवार, शमा चौकसे, रेणूक मुळे, भाग्यश्री मोकसदार, वर्षा उफाळे, कावेरी लटपटे, मनीषा उईके, राधा तारे, संध्या चरजन, दुर्गा बिसंदरे, नीता मेटकर, विजया वाकोडे व अनेकाच्या अवक परिश्रमाने नारी सक्ती संमेलन यशस्वी रीतीने पार पडले.

# महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिना निमित्त महाआरोग्य व रक्तदान शिबिर चे आयोजन

## जीवन आधार संस्था व शालिनीताई मेघे हॉस्पिटल माध्यमातून आयोजन

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक गोंदिया** – महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनाचे औचित्य साधून,भारत राखीव बटालियन,राज्य राखीव पोलीस बल, गोंदिया जीवन आधार बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या , शालिनीताई मेघे हॉस्पिटल व रोटरी क्लब साऊथ ईस्ट, यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिर ,रक्तदान शिबिर व उत्कृष्ट समाज भूषण व अधिकारी पुरस्कार कार्यक्रम चे आयोजन दि.८ जानेवारी २०२३ ला गोंदिया येथे आयोजित करण्यात आले नक्षलग्रस्त भागातील गोरगरीब नागरिकांना या मोफत आरोग्य संधीचा फायदा व्हावा या करिता समादेशक श्री अमोल गायकवाड डी वाय एस पी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबिर चे आयोजन करण्यात आले आले या मध्ये ४५१ नागरिकांनी लाभ घेतला तर मोफत ऑपरेशन सेवा करीता ९० पेशंट ला रेफर करण्यात आले आहे तसेच या मध्ये रक्तदान सुद्धा करण्यात आले या मध्ये ६२ जवनांनी रक्तदान करून रक्तदानाचे अमुल्यदान दीलेखरे पाहिले तर राज्य राखीव





पोलीस बल अनन्यसाधारण महत्व असलेले बल असून बिकट परिस्थितीला सामोरे जाण्याचे प्रशिक्षण प्राप्त बल आहे. महाराष्ट्र पोलीस बलाचा कणा म्हणून या बलाची ओळख आहे.

अनेक मोहिमा यशस्वीरीत्या हाताळणाऱ्या राज्य राखीव पोलीस बलाचे कार्य कौतुकास्पद आहे. अश्या स्वता:कौतुकास्पद कामगिरी करणाऱ्या पोलीस बलाने जीवन आधार संस्थेला विनम्र, शिस्तबध्द मानाची सलामी व मानवंदना देऊन आदर व गौरव केला नक्षलग्रस्त भागात मोफत आरोग्य सेवा देणारी पहिली सामाजिक संस्था जीवन आधार आहे असे वक्तव्य समादेशक अमोल गायकवाड यांनी आपल्या वक्तव्यातून बोलतांना व्यक्त केले या वेळी पोलीस दल तर्फे या मध्ये जीवन जवंजाळ यांना उत्कृष्ट समाज भूषण पुरस्कार व अश्विन रडके यांना उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार व राजीव वरभे यांना कार्यगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले

या वेळी उपस्थित समादेशक श्री अमोल गायकवाड, सहाय्यक श्री प्रमोद लोखंडे ,सहायक कैलास पुसाम, सहाय्यक समादेशक मंगेश शेलोटकर, सहाय्यक समादेशक केबीसी, पोलीस निरीक्षक धीरज उमळवाडकर, पोलीस उपनिरीक्षक सुनील चव्हाण, जीवन जवंजाळ संस्थापकअध्यक्ष जीवन आधार , डॉ आश्विन रडके ,राजीव वरभे अध्यक्ष रोटरी क्लब नागपूर साऊथ ईस्ट, सुयोग गोरले सहसचिव जीवन आधार, रोशन दारोकार जिल्हा अध्यक्ष जीवन आधार व सर्व अधिकार कर्मचारी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# उबाठा उबाठा काय?...,

## पत्रकार परिषदेत संतापले उद्धव ठाकरे!

### उद्धव ठाकरे यांची राहुल नार्वेकरांवर सडकून टीका



**दि.११विदर्भ प्रजासत्ताक मुंबई :** विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज शिवसेना आमदार अपात्रतेच्या प्रकरणावर अंतिम निकाल जाहीर केला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गटच मुख्य शिवसेना असल्याचे निरीक्षण राहुल नार्वेकर यांनी नोंदवले आहे. तसेच, दोन्ही गटांचे आमदार पात्र ठरवले. निकालादरम्यान, राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेच्या १९९९ सालच्या घटनेचा आधार दिला. तर, सुनिल प्रभूंचा व्हीप अवैध असल्याचे सांगून भरत गोगावलेंचा व्हीप राहुल नार्वेकरांनी मान्य केला आहे. दरम्यान, आजच्या या निकालानंतर उद्धव ठाकरे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधत आपला संताप व्यक्त केला आहे. तर कटकारस्थान रचून लोकशाहीची हत्या करण्यात आली आहे, असा आरोपही उद्धव ठाकरे यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर केला आहे.

आजच्या निर्णयानंतर उद्धव ठाकरे यांनी राहुल नार्वेकरांवर सडकून टीका केली. स्वतः दोन तीन पक्ष बदलणाऱ्या नार्वेकरांनी पक्षांतर बंदी कायदा अधिक मजबूत करण्याऐवजी त्यांनी पक्षांतर कसं करावं याचा निर्णय दिला. विधानसभा अध्यक्षांना जे काही संरक्षण असतात त्याचा त्यांनी गैरवापर केला. शिवसेना कुणाची हे लहान मुलही सांगू शकतं, असे उद्धव ठाकरे म्हणाले. तसेच,नार्वेकरांना त्या ठिकाणी कशासाठी बसवण्यात आले, ते आता समोर आले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निकाल हे सर्वोच्च असतात, एक परिमान असते. पण नार्वेकरांनी सर्वोच्च न्यायालयाचे नियम धाब्यावर बसवले. त्यांच्या मागे महाशक्ती असल्यामुळे ते सर्वोच्च न्यायालयाच्य वर असल्याचे दाखवून दिले. शिवसेना कुणाची याचा निर्णय निवडणूक आयोगाचा निर्णय चुकीचा आहे. त्यावर सर्वोच्च न्यायालयात लढाई सुरू आहे. पण नार्वेकरांनी सर्वोच्च न्यायालयाचा अपमान केला, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

विधानसभा अध्यक्षांनी कोणालाच कसे अपात्र केले नाही? असा प्रश्न उपस्थित करत विधानसभा अध्यक्षांवर निशाणा साधला आहे. त्यांनी अपात्र कोणालाच केलेले नाही. मूळ प्रकरण हे अपात्रतेचे होते. अपात्र कोणालाच ठरवले नाही. आमची घटना दुरुस्ती तुम्ही ग्राह्य धरत नसाल तर मग तुम्ही आम्हाला अपात्र का नाही केले? त्याही पलिकडे जावून त्यांनी निकाल दिला की शिवसेना कोणाची? शिवसेना कुणाची याचे उत्तर महाराष्ट्रातील लहान मुलंही देईल. एवढे हे स्पष्ट आणि स्वच्छ आहे, असा दावाही उद्धव ठाकरे यांनी केला आहे. याचबरोबर, 'उबाठा' उल्लेखावर पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे संतापले. ते म्हणाले, आमचा गट म्हणजे उबाठा नाही. माझं नाव उद्धव बाळासाहेब ठाकरे असं स्वच्छ आणि स्पष्ट नाव आहे. उबाठा, उबाठा काय? मग बाकीच्यांच्या आई-वडिलांची नावंही तुम्ही तशीच लावणार का? आणि उबाठा असेल तर या अन्यायाविरोधात मी उभा ठाकलेला आहे.

# कठोरा रिंगरोड मार्गावर शिवसेना शिंदे गटाची जोरदार आतीषबाजी

## आमदार बच्चू कडू यांची ही उपस्थिती



**दि.११विदर्भ प्रजासत्ताकअमरावती** – विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निर्णयाचे शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अरुण पडोळे यांच्या नेतृत्वात कठोरा रिंग रोड येथे फटाक्यांची आतषबाजीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी अरुण पडोळे यांच्या वाढदिवसाला मिळालेली ही सर्वात मोठी भेट असल्याचे सांगत शिवसेना शिंदे गटाचीच, असा विश्वास व्यक्त करत एक दुसऱ्याला बर्फीचे वाटप करण्यात आले.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेना कुणाची तर एकनाथ शिंदे यांची, असा निर्णय घोषित केला. हा निर्णय घोषित होताचशिवसेना शिंदे गटामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. याच दिवशी जिल्हाप्रमुख अरुण पडोळे यांचा वाढदिवस असल्याने कठोरा रिंग रोड मार्गावर स्थित लोटस इनमध्ये या निर्णयाचे स्वागत व जल्लोष म्हणून फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यादरम्यान आमदार बच्चू कडू देखील उपस्थित झाल्याने जल्लोषाला चांगलाच रंग चढला. बच्चू कडू यांनी अरुण पडोळे हे बालमित्र असल्याने तसेच शिवसेनेशी आपले जुने नाते असल्याने त्यांना शुभेच्छा देण्यासाठी आल्याचे सांगत त्यांनी देखील या निर्णयाचे स्वागत केले. यावेळी डीजेच्या तालावर शिवसैनिक चांगलेथिरकले. यामध्ये युवा सेना जिल्हाध्यक्ष प्रवीण दिधाते, शिवसेना सहाय्यक संपर्कप्रमुख दीपक मदनेकर, उपजिल्हाप्रमुख छत्रपती पटके, महिला आघाडी जिल्हा संघटक नमिता तिवारी, रेखा खारोडे, शिवसेना शहरप्रमुख गुड्डू कत्तलवार,आशिष ठाकरे, युवा सेना जिल्हा समन्वयक अक्षय पवार, दीपक खैरकर, अनिल वानखडे, अमोल भुयार, गौतम खंडारे, अविनाश शंके, शिवसेना उपशहर प्रमुख मुकेश उसरे, नितीन शर्मा, मनोज पांडे, प्रथमेश बोबडे, यश कटवले, तुषार प्रमुख, आकाश खडसे, प्रथमेश बोबडे, आयुष देशमुख यांच्यासह शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.



# 'बोधिसत्व' वसुंधरा फिल्म फेस्टिव्हलमध्ये नॅशनल जिओग्राफिक'द्वारे लघुपटाची निर्मिती

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक यवतमाळ : –** शालेय जीवनापासून पर्यावरण संरक्षणाचे काम करत असलेल्या येथील बोधिसत्व खंडेराव या विद्यार्थ्याने केलेल्या पर्यावरण विषयक केलेल्या कामावर आधारित लघुपटाची आंतरराष्ट्रीय किर्लोस्कर वसुंधरा फिल्म फेस्टिवलमध्ये निवड झाली आहे. उद्या १० जानेवारी रोजी हा लघुपट महोत्सवात दाखविण्यात येणार आहे. नॅशनल जिओग्राफिक वाहिनीने या लघुपटाची निर्मिती केली, हे विशेष.

बोधिसत्वच्या पर्यावरण विषयक कामावर गतवर्षी नॅशनल जिओग्राफीक चॅनलने एक लघुपट तयार केला होता. तो जागतिक वसुंधरा दिनानिमित्ताने विविध चॅनलवरून प्रसारित झाला होता. किर्लोस्कर वसुंधरा फिल्म फेस्टिवल हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा चित्रपट महोत्सव आहे. यावर्षी महोत्सवात जगभरातील गाजलेले पर्यावरण विषयक चित्रपट आणि लघुपट दाखवले जात आहेत.बोधिसत्व खंडेराव याने वयाच्या सहाव्या वर्षी सामाजिक वनीकरणाच्या कामासाठी पुढाकार घेतला वेगवेगळ्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, महाविद्यालये, बचत गट, ग्रामपंचायत, समर कॅम्प, एनसीसी आणि एनएसएस कॅम्प, सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रम, अशा अनेक ठिकाणी जाऊन पाचशेहून अधिक सामाजिक वनीकरणाच्या कार्यशाळा आयोजित केल्या.

रँण्ड सीडबॉल मेथड, ग्रीन पाऊस मेथड, पर्ण-बीज मेथड, मॅजिक सॉक्स मेथड या सामूहिक वनीकरणाच्या चार नवीन पद्धती विकसित केल्या. 'द यंगेस्ट इन्व्हायरमेंटल अँक्टिव्हिस्ट' म्हणून इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये त्याची नोंद झाली आहे. सिंगल युज प्लास्टिक विरोधात आंदोलन सुरू केले आणि हजारो विद्यार्थ्यांना सिंगल युज प्लास्टिक न वापरण्याची सामूहिक शपथ दिली. कापडी पिशव्या वापरण्यास प्रोत्साहन देण्याकरिता जवाहरलाल दर्डा



इंग्लिश मीडियम स्कूल मधील विद्यार्थ्यांना सोबत घेऊन १० हजार कापडी पिशव्यांचे वाटप केले.नो प्लॅस्टिक रॅलीचे आयोजन केले. स्कूल ऑफ स्कॉलर्स यवतमाळ येथील विद्यार्थ्यांच्या मदतीने औषधी महत्त्वाच्या सत्तावीस झाडांची लागवड करून जागृती वनाची स्थापना केली.

यवतमाळच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील ४० महिलांना या धान्य सफाई यंत्रांचे मोफत वाटप केले. नॅशनल जिओग्राफिक चॅनलने बोधिसत्वच्या याच पर्यावरण विषयक कामावर आधारित लघुपटाची निर्मिती आणि प्रसारण केले. वसुंधरा फिल्म फेस्टिवलमध्ये हाच लघुपट दाखवला जाणार आहे. यवतमाळच्या तरुण पर्यावरण कार्यकर्त्याची नॅशनल जिओग्राफीकने घेऊन आता हा लघुपट आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवलमध्ये प्रदर्शित होत असल्याने यवतमाळात आनंद व्यक्त होत आहे

# दर्यापूरातही शिवसेना शिंदे गटाचा जल्लोष

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर–** बुधवारी सकाळपासूनच शिवसेनाकोणाची याचा निकाल लागणार यामुळे सर्वांचे लक्ष निकालाकडे लागल होते.शिवसैनिकशिदेगटजिल्हा शिवसेनाप्रमुख गोपाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते मोठ्या संख्येने महात्मा गांधी पुतळा येथे उपस्थित झाले व त्यांनी एकच जल्लोष केला चौकात फटाक्यांची आतिशबाजी करत विविध घोषणांनी चौक दणदणून गेला होता. गोपाल पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है...एकनाथ शिदे साहेबयांचा विजय असो...! बाळासाहेबठाकरे यांचा विजय असो...! त्या विविध घोषणां देत जल्लोष करताना शिवसैनिक शिदे गट दिसत होते.

त्यामध्ये प्रामुख्याने गोपाल पाटील अरबट यांच्या समवेत तालुकाप्रमुखमहेंद्र पाटील भांडे, राहुलगावंडे, राहुल बबर, अतुल पाटील सगने, नागे, डोंगरदिवे, राणे, गावंडे व इतर बहुसंख्या तालुक्यातील शिवसैनिक शिदे गट उपस्थित होते.

विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. चौकात जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. गोपाल पाटील आगे बढो हम तुम्हारे साथ है...एकनाथरावशिदेयांचाविजय असो, बाळासाहेब ठाकरेंचा विजय असो अशा विविध घोषणा शिवसेनेकांनी दिल्या होत्या.

# लोकशाही आणि न्याय यंत्रणेची खिल्ली उडवणारा निकाल



**दि११ विदर्भ प्रजासत्ताकअमरावती** विधानसभा अध्यक्ष ड .राहुल नार्वेकर यांनी आमदार अपात्रते संदर्भात दिलेला निकाल हा सध्याच्या राजकीय परिस्थितीला साजेसाच आहे. मित्र पक्षाच्या आमदारांना विधानसभा अध्यक्षांनी अभय दिले नसते तरच नवल. मात्र त्याचवेळी विधानसभा अध्यक्षांनी सूची १० आणि लोकशाहीची थट्टा केली आहे इतकच नाही तर सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल चुकीचा ठरवत न्याय यंत्रणेची ही खिल्ली उडवली आहे अशी प्रतिक्रिया कॉंग्रेसच्या ज्येष्ठ आमदार आणि माजी मंत्री ड.यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केली आहे.शिवसेना ही केवळ शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि त्यानंतर उद्धव ठाकरे यांचीच आहे हे महाराष्ट्रातील तमाम जनतेला माहित आहे. मात्र काही तांत्रिक मुद्द्यांचा आधार घेत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेना एकनाथ शिंदेची असल्याचा उफराटा निर्णय दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने भरत गोगावले यांची प्रथम म्हणून केलेली नियुक्ती चुकीची आहे असे म्हटल्यानंतरही नार्वेकर यांनी भरत गोगावले यांची नियुक्ती योग्य ठरवत शिंदे गटाच्या आमदारांना अपात्रतेपासून वाचविले आहे. ही सरळ सरळ न्याय यंत्रणेची थट्टा आहे असेही ड. ठाकूर म्हणाल्या. विधानसभा अध्यक्षांना असलेल्या आणि लोकशाहीने दिलेल्या अधिकराचा नार्वेकर यांनी गैरवापर केल्याचे यापेक्षा मोठे उदाहरण विधिमंडळाच्या इतिहासात असणार नाही. विधिमंडळाच्या न्यायदानाच्या इतिहासातला हा काळा दिवस असेल. केवळ जनतेच्या दरबारात उद्या जावे लागणार आहे म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या आमदारांनाही त्यांनी अपात्र केले नाही. पण म्हणून त्यांनी दिलेला निर्णय हा निश्चितच समर्थनिय नाही. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने जर उद्या न्यायालयात दाद मागितली तर आम्ही त्यांच्या बाजूने असूच महाविकास आघाडी म्हणूनही आम्ही आता एकसंघपणे या लोकशाहीची थट्टा करणाऱ्या या शक्तींना गाडल्याशिवाय राहणार नाही असेही ड. ठाकूर यावेळी म्हणाल्या.

# शिवसेना महानगर प्रमुखाच्या शोक संदेशात विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकरांना देवाज्ञा

## अनोख्या पद्धतीने नोंदविला निषेध

**दि.११विदर्भ प्रजासत्ताकअमरावती** विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर यांनी आमदार अपात्रतेप्रकरणी निर्णय देत खरी व मूळ शिवसेना ही शिंदे गटाची असल्याचा निकाल देताच उध्दव ठाकरे गट संतप्त झाला असून खरी शिवसेना ही हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची असल्याचे सांगत शिवसेना महानगर प्रमुख पराग गुडदे यांनी राहुल नार्वेकरांना देवाज्ञा झाली अशी शोकसंदेश पत्रिका व्हायरल करीत निषेध नोंदविला आहे.या शोकसंदेश पत्रिकेत स्व. श्री. राहुल सुरेश नार्वेकर यांना १० जानेवारी २०२४ ला देवाज्ञा झाली असून दशक्रियेचा कार्यक्रम शनिवारी २० जानेवारी २०२४ रोजी सकाळी आठ वाजता भाजप कार्यालय येथे आयोजित केल्याचे तसेच शुद्दपंगत कार्यक्रम बुधवारी २४ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथे आयोजित केल्याचा उल्लेख आहे. शोकाकूल म्हणून पराग गडधे शिवसेना महानगर प्रमुख अमरावती व समस्त शिवसैनिक व नागरिक असल्याचे पत्रिकेच्या शेवटी नमूद आहे. या पत्रिकेवरून शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांचा राहूल नार्वेकरांबद्दलचा संताप दिसून येत असून तो त्यांनी थेट नार्वेकरांना देवाज्ञा झाल्याची पत्रिका व्हायरल करीत व्यक्त केला आहे. सध्या ही पत्रिका जिल्ह्यात चर्चेचा विषय झाली आहे



शोक संदेश

श्री. /श्रीमती

आपणास कळविण्यात अत्यंत दुःख होत आहे कि,

स्व. श्री. राहूल सुरेश नार्वेकर

रा. कुलाबा विधानसभा (मुंबई), ह्यांना बुधवार दि. १०/०१/२०२४ रोजी देवाज्ञा झाली

* दशक्रियेचा कार्यक्रम *
शनिवार दि. २०/०१/२०२४ रोजी
सकाळी ०८.०० वा.
*स्थळ*
भा.ज.प कार्यालय

* शुध्दपंगत कार्यक्रम *
बुधवार दि २४/०१/२०२४ रोजी
सकाळी १२.०० वा.
स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

*शोकाकुल*

श्री. पराग गुडधे (शिवसेना महानगर प्रमुख अमरावती व समस्त शिवसैनिक नागरिक महाराष्ट्र राज्य

# स्नेहसंमेलनामधून आव्हाने झेलणारी पिढी निर्माण होते

## पत्रकार मंगेश तायडे यांचे प्रतिपादन, माध्यमिक कन्या शाळेत वार्षिक स्नेहसमेलन

**दि.११विदर्भ प्रजासत्ताकनांदगाव पेठ** – पुस्तकी ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळणे गरजेचे आहे, आजकालचे विद्यार्थी आधुनिक संसाधनांमुळे एकटी पडत आहे मैदानी खेळ सुद्धा कमी खेळत आहे त्यामुळे शाळांमधून होणारी स्नेहसंमेलने विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना समोर आणण्याचे प्रभावी माध्यम ठरत आहे,याच स्नेहसंमेलनामध्ये मोठमोठी आव्हाने झेलणारी पिढी निर्माण करण्याचे सामर्थ्य असून भारताचे भविष्य समजली जाणारी आजची पिढी यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन पत्रकार मंगेश तायडे यांनी माध्यमिक कन्या विद्यालय येथील वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात केले. ते सत्कारमूर्ती म्हणून आपले मनोगत व्यक्त करत होते.

माध्यमिक कन्या शाळेच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनात विविध क्षेत्रांतील उल्लेखनिय कामगिरी करणार्या पत्रकारांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. पत्रकारिता क्षेत्रातील राष्ट्रीय स्तराचा पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल पत्रकार मंगेश तायडे, शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रा.गणेश पोकळे तसेच क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल सप्तरंग क्रीडा मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र तुळे,सुवर्णकण्या तथा विद्यालयाची माजी विद्यार्थिनी वैष्णवी मुळे यांचा सत्कार करण्यात आला. या



सत्कार सोहळ्याला विचारपिठावर अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. सुनीता बाळापुरे या लाभल्या होत्या तर उदघाटक म्हणून डॉ. नयना दापुलकर ,मुख्याध्यापिका नलिनी ढानके ,सेवानिवृत्त शिक्षिका पुष्पा तिखे यांची उपस्थिती होती. सर्व सत्कारमूर्तींचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सत्कारमूर्ती प्रा. गणेश पोकळे, राजेंद्र तुळे यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमादरम्यान माध्यमिक कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी नृत्य, स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाच्या शिक्षिका ज्योती सोळंके, नितीन चौधरी, मयुरी बानासुरे,समीक्षा कापडे, वैष्णवी गोलाईत,कैलाश सोनोने यांचेसह सर्व शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थीवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका अलका मेश्राम यांनी केले तर आभार सोनाली वानखडे यांनी मानले.

पाहिजेत

विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक

अल्पावधीतच हजारो वाचकांच्या पसंतीस पडलेल्या सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक साठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका,गाव तसेच वॉर्डनिहाय पत्रकारांची गरज आहे.लिखाणाची आवड तसेच उत्कृष्ट जनसंपर्क असणाऱ्या व्यक्तींनीच आमच्या मेल आय डी वर आजच संपर्क करा

संपर्क– prajasattaknews24gmail.com

# नवोपक्रम स्पर्धा २०२३-२४ चा निकाल घोषित

## अर्चना मेश्राम ,सुधीर केने ,श्रीनाथ वानखडे ,डॉ. सुचिता पाटेकर प्रथम

## विभागीय नवोपक्रम स्पर्धा : १६ जानेवारीला डायट मध्ये पारितोषिक वितरण

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्याच्या शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२३ -२४ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा अमरावती जिल्हा व विभाग स्तरावरील निकाल जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती यांनी नुकतेच जाहीर केला आहे. यामध्ये प्राथमिक शिक्षक गटातून अर्चना मेश्राम, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक गटातून सुधीर केने ,विषय सहाय्यक विषय साधनव्यक्ती विशेष शिक्षक व ग्रंथपाल गटातून श्रीनाथ वानखडे तर अध्यापकाचार्य व पर्यवेक्षीय अधिकारी गटातून डॉ. सुचिता पाटेकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे.नवोपक्रम स्पर्धेच्या जिल्हा व विभाग स्तरावरील गुणवत्ता प्राप्त स्पर्धकांची यादी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने घोषित केली आहे .त्यामध्ये प्राथमिक गटातून जि प प्राथमीक शाळा टोली ,ता.धारणी येथील अर्चना यशवंत मेश्राम यांनी प्रथम , जि प कन्या शाळा अमरावती येथील वीरेंद्र









अज्ञानसिंग ब्राह्मण यांनी द्वितीय, मनपा प्राथमिक मराठी शाळा निंभोरा येथील गोपाल नारायणराव अभ्यंकर यांनी तृतीय तर जि प शाळा बऱ्हाणपूर तालुका मोर्शी येथील डॉ. निलेश रामभाऊ इंगोले यांनी चतुर्थ क्रमांक पटकावला. जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा मल्हारा येथील श्रीकृष्ण महादेव उघडे व जिल्हा परिषद शाळा आडगाव खाडे तालुका अंजनगाव येथील कांचन दादाराव भांगे यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय मालखेड रेल्वे येथील सुधीर पंजाबराव केणे यांनी प्रथम ,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय पिंपरी पूर्ण तालुका चांदूरबाजार येथील श्रीकांत गंगाधर निकम यांनी द्वितीय ,जनता गर्ल्स हायस्कूल शेंदूरजना घाट तालुका वरुड येथील अतुल रमेशराव पडोळे यांनी तृतीय तर बाबाराव ढवळे विद्यालय खराळा तालुका चांदूरबाजार येथील कु. शुभांगी सवई यांनी चतुर्थ क्रमांक पटकावला.

विषय सहाय्यक, विषय साधन व्यक्ती, समावेशित साधन व्यक्ती ,विशेष शिक्षक व ग्रंथपाल या चौथ्या गटातून गटसाधन केंद्र चांदूर रेल्वे येथील विषय साधन व्यक्ती श्रीनाथ साहेबरावजी वानखडे यांनी प्रथम, गटसाधन केंद्र भातकुली येथील मीनाक्षी पंडित खतरमोल यांनी द्वितीय, गटसाधन केंद्र वाशिम येथील विशेष शिक्षक स्वाती राजेंद्र नाचवणे यांनी तृतीय ,गटसाधन केंद्र मानोरा येथील समावेशित तज्ञ मोतीराम तुकाराम जाधव यांनी चतुर्थ क्रमांक पटकावला .गटसाधन केंद्र मेहकर येथील विषय साधन व्यक्ती नीता श्रीधरराव देशमुख यांनी पाचवा तर गटसाधन केंद्र वाशिम येथील स्वाती हरीकिसन ढोबळे यांना व गटसाधन केंद्र मानोरा येथील विषय साधनव्यक्ती धनराज माजी मेहल्डे यांना उत्तेजनार्थ बक्षीस घोषित करण्यात आले आहे.

अध्यापकाचार्य व पर्यवेक्षीय अधिकारी गटातून माध्यमिक शिक्षणाधिकारी जि प अकोला डॉ. सुचिता आनंद पाटेकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. पंचायत समिती उमरखेड जिल्हा यवतमाळ येथील गटशिक्षणाधिकारी सतीश दर्शन वाढ यांनी द्वितीय, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ येथील डॉ. मधुमती सांगळे यांनी तृतीय, केंद्रप्रमुख वाशिम येथील नामदेव पांडुरंग सरदार यांनी चतुर्थ ,केंद्रप्रमुख वाशिम आनंद संभाजी सुतार यांनी पाचवा तर केंद्रप्रमुख अशोक सदाशिवराव महल्ले यांना उत्तेजनार्थ पारितोषिक घोषित करण्यात आले आहे.

विजयी स्पर्धकांना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती येथे १६ जानेवारी रोजी सकाळी अकरा वाजता पारितोषिक वितरण प्रादेशिक विद्या प्राधिकरण तथा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती येथे करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वरिष्ठ अधिव्याख्याता श्रीमती प्रेमला खरटमोल यांनी दिली.

# मोर्शीत माजी नगरसेविकेवर प्राणघातक हल्ला

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी**

नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका तथा आरोग्य सभापती सुनीता कुमरे यांच्यावर ७ जानेवारी रोजी रात्री ९च्या सुमारास प्राणघातक हल्ला करण्यात आला. पोलिस सूत्रांनुसार, पेठपुरा ते मोर्शी पंचायत समिती कार्यालय मार्गावर नगरपरिषदेच्या निर्माणाधीन वास्तूसमोरच सुनीता दयालाल कुमरे यांचे राहते घर आहे. घरातच त्यांचे पती किराणा दुकान चालवितात व सुनीता कुमरे या कॅटरिंगचा व्यवसाय करतात. ७ जानेवारी रोजी गिट्टी खदानपरिसरात राहणारा मनोज संतलाल ईडपाची (४०) याच्या ६० वर्षीय आईने दयालाल यांच्या किराणा दुकानात किराणा सामानाची मागणी केली. मात्र, आधीचे पैसे जमा करा, नंतर सामान घेऊन जा, असे दयालाल यांनी म्हटले. त्यावरून ती महिला दयालाल यांना शिवीगाळ करून घरी निघून गेली. लगेच मनोज इडपाची हा दुकानात आला व दयालाल यांना मारहाण सुरू केली. सुनीता कुमरे या मध्यस्थी करायला गेल्या असता, मनोजने त्याच्या हातातील स्टीलच्या कड्याने सुनीता यांच्या डोक्यावर प्रहार करून शिवीगाळ केली व दोघांनाही मारून टाकण्याची धमकी देऊन तेथून निघून गेला. रक्तस्राव झाल्याने माजी नगरसेविका सुनीता कुमरे यांना तत्काळ मोर्शी उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी परिस्थितीचे गांभीर्य पाहून सीटी स्कॅनकरिता तिला जिल्हा सामान्य रुग्णालयात रवाना करण्यात आले. मोर्शी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास मोर्शीचे ठाणेदार श्रीराम लांबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.



# जिल्ह्यातील कारसेवकांचा १२ जानेवारीला सत्कार : जगदीश गुप्ता मित्र परिवाराचे आयोजन

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जानेवारीला अयोध्येतील मंदिरात प्रभु श्रीरामचंद्रांच्या मुर्तीचा प्राणप्रतिष्ठा होणार आहे. पाचशे वर्षाच्या प्रतीक्षेनंतर अयोध्येत नवनिर्मित मंदिरात हिदुस्थानाच्या स्वाभिमानाची पुर्नस्थापना होईल. यानिमित्ताने जगदीश गुप्ता मित्र परिवाराव्दारे १२ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रमाचे औचित्य साधुन श्रीराममंदिर पुननिर्माणचा आनंदोत्सव व कारसेवकांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात आयोजित या कार्यक्रमात चंद्रशेखरजी भोंदू, अमरावती विभाग संघचालक राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, उपेन्द्रजी कोठेकर, विदर्भ संघटनमंत्री भाजपा, खा. डॉ. अनिल बोंडे, खा. नवनीत राणा यांच्या हस्ते हा सत्कार सोहळा पार पडेल. बॉलीवुड ॲक्टर वरुण शर्मा, याचसोबत सन २०१८ मध्ये बी लाईव्ह भक्ती रॉक बॅन्डची स्थापना महेश कुकरेजा यांच्या परिकल्पनेतुन गीतकार, संगीतकार गायक अभिदत्त, जे.जे.वीक यांच्या साथीने भारतीय युवकांमध्ये पारंपारिक भक्ती संगीताचे वैविध्यपुर्ण शैलीत रूपांतर करून त्याला आकर्षक आणि विश्वकिर्ती पद प्राप्त करून देणाऱ्या ख्यातनाम कलाकारांचा' भक्ती द रॉक बॅन्ड'चा लाईव शो होणार आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी देखिल ट्विटरवर या रॉक बॅन्डची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे, हे विशेष. समस्त अमरावती रहवाशी यांना या भव्यदिव्य कार्यक्रमात प्रत्यक्ष उपस्थित राहुन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# तुमच्या लढाईत आम्हीही सहभागी : यशोमती ठाकूर

## महामार्ग रोखण्याचा दिला इशारा

**दि११विदर्भ प्रजासत्ताक तिवसा**

केंद्र सरकारने वाहन चालक- मालक संघटनांवर अन्यायकारक कायदा पारित केला आहे. त्यामुळे वाहन चालक मालक संघटनेने राज्यव्यापी संप पुकारला आहे. वाहन चालक-मालक समितीच्या मागण्या रास्त असून सरकारने ताबडतोब काळा कायदा रद्द करावा, या आंदोलनात वाहन चालक मालक संघटना एकट्या नसून आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, असे मत माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केले. त्या तिवसा येथे उपोषणकर्त्यांशी संवाद साधताना बोलत होत्या.



हिट अँड रन कायद्याविरोधात तिवसा तालुका चालक -मालक समितीने बुधवारपासून पेट्रोल पंप चौकात बेमुदत साखळी उपोषण सुरू केले. सरकारने पारित केलेल्या कायद्यात रस्त्यावर वाहन चालवताना चालकांकडून अपघात झाल्यास अजामीनपात्र गुन्ही दाखल होणार आहे. दहा वर्षे कारावास व सात लाख दंड चालकाच्या मानगुटीवर बसणार आहे. तेव्हा ताबडतोब सरकारने हा काळा कायदा कायमस्वरूपी रह करावा, अन्यथा महामार्ग रोखू, असा इशारा चालक-मालक समितीकडून देण्यात आला. नितेश पिंगळे, प्रदीप गवई, संजय कपिले, मयूर शिरपूरकर, हर्षल शिरभाते, नरेश नागपुरे, राजुभाऊ डहाके, शेखर मुंद्रे, दादाराव तायवाडे, अनिकेत काजळकर, शेख रफीक उपोषणात सहभागी झाले आहेत.

**जगण्याचा अधिकार हिसकावण्याचा प्रयत्न**

कित्येक सुशिक्षित बेरोजगारांनी आपले घरदार गहाण ठेवून, कर्ज काढून वाहने घेतली आहे. त्यावर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. पै-पै जमा करून वाहनांचे हप्ते भरावे लागतात. अशावेळी चालक या काळ्या कायद्याचा बळी ठरला तर त्याच्या अख्ख्या कुटुंबाला आत्महत्येशिवाय पर्याय उरणार नाही.अशी हृदयद्रावक साद उपोषणकर्त्यांकडून घालण्यात येत आहे.

**२१ वाहन चालकांनी मुंडन करून या कायद्याचा केला निषेध**

देशात लागू करण्यात आलेल्या नवीन हिट अँड रन कायद्याच्या विरोधात अमरावती जिल्हा वाहन चालक कृती समितीच्या नेतृत्वात इर्विन चौक येथे गेल्या सहा दिवसा पासून बेमुदत साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. आज सातव्या दिवशी २१ वाहन चालकांनी उपोषण स्थळी मुंडन आंदोलन करून या हिट अँड रन कायद्याचा निषेध केला.

# लोकवर्गणी मधून तयार केलेले रस्ते पाहून जिल्हाधिकाऱ्यांनी केले ग्रामस्थांचे कौतुक



**दि११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

सरकारी काम आणि सहा महिने थांब, असे म्हणतात. त्यामुळेच शासनाच्या कोणत्याही विभागावर अवलंबून न राहता अंजनगावसुर्जी तालुक्यातील चौसाळा ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून पाणंद रस्ता आणि पाण्याच्या डोहाचे काम करण्याचा निर्णय घेतला हे काम पूर्णत्वासही गेले. हा चर्चेचा विषय झाल्यानंतर खुद्द जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांची पावले या गावाकडे वळली आणि त्यांनी ग्रामस्थांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.चौसाळा हा परिसर फळ संत्र्यांसोबतच सीताफळ लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचा भागात मोठी आहे. परंतु, चौसाळा ते तूरखेड या पाणंद रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाल्याने या भागातून मुख्य रस्त्यापर्यंत फळांची वाहतूक करणे कसरतीचे ठरत होते. त्याच्या परिणामी बागायतदारांना त्यांच्या शेतमालाचा परतावा कमी मिळत होता. ही बाब लक्षात घेता उपसरपंच मंगेश ढोरे, हर्षद काळमेघ यांनी लोकवर्गणीतून पाणंद रस्ता वपाण्याचे डोह निर्माण करण्याचा निर्णय घेतला. रस्त्यालगत शेती असलेल्या १०९ शेतकऱ्यांनी याकरिता वर्गणी दिली. यातून ४ लाख ३७ हजार रुपये गोळा झाले. यात साडेतीन कि.मी. रस्ता तयार केला. शिंगमोडी नदीपात्रातूनसाहित्त्याचा वापर रस्त्यासाठी केला. यामुळे नदीपात्रात २१ लाख लीटर जल संकलित होईल, असा डोह तयार केले. १२० मीटर लांब, १३ मीटर रुंद आणि ९ फूट उंच असे खोलीकरण या कामातून झाले. २२ हजार रुपये शिल्लक आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांकडून सहकार्याची ग्वाही

या कामाविषयीची दखल घेत जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांची पावले आपसूकच गावाकडे वळली, तब्बल पाऊण तास त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांचे कौतुक केले. अशाप्रकारच्या लोकाभिमुख कामासाठी प्रशासन सहकार्य करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

पाणंद रस्ते कामात वापरलेल्या नदीपात्रातील साहित्याची पुण्यातील प्रयोगशाळेत गुणवत्ता तपासण्यात आली. त्याआधारे भार वहनक्षमता १० टन आहे. संपूर्ण तांत्रिक बाबी तपासत हा रस्ता केला. शासनाचा पाणंद रस्त्यावरील खर्च ३० लाख रुपये प्रतिकिलोमीटर आहे. चार लाख २० हजार रुपयांत साडेतीन किलोमीटर रस्ता केला.

**मंगेश ढोरे, उपसरपंच, चौसाळा**

# पक्षपाती निर्णया विरोधात बडनेरा येथे शिवसेनेची निदर्शने

## शिंदे सरकार व राहुल नार्वेकरांचा केला निषेध

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शिवसेना पक्षाची घटना नाकारून तसेच सुप्रीम कोर्टाचे निर्देश डावलत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेना शिंदेंची असल्याचा निर्णय दिला. या निर्णयामुळे शिवसैनिक संतप्त झाले असून हा निर्णय पक्षपाती असल्याचा आरोप करीत शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्या नेतृत्वात बडनेरा जुनी वस्ती चौकात निदर्शने करीत शिंदे सरकार व राहुल नार्वेकरांचा निषेध करण्यात आला..शिवसेना कुणाची यासंदर्भात निर्णय येताच संतप्त शिवसैनिकांनी बडनेरा जुने वस्ती चौकात एकत्र येत शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्या नेतृत्वात निदर्शने आंदोलन करीत घोषणाबाजी केली आणि शिंदे सरकार तसेच राहुल नार्वेकर यांचा निषेध केला. सुप्रीम कोर्टाचे निर्देश डावलत नार्वेकरांनी दिलेला निर्णय अत्यंत चुकीचा असून हा निर्णय पक्षपातीपणा आणि भेदभाव करणारा असल्याचे दिसून आले आहे. सुप्रीम कोर्टात या प्रकरणात न्याय मिळणार असा विश्वास व्यक्त करीत या तथाकथित व कुनियोजित निर्णयामुळे उद्धव ठाकरे यांच्या बद्दल महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आदर निर्माण झाला आहे अशी प्रतिक्रिया शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी यावेळी दिली. या निदर्शने आंदोलनामध्ये राजूभाऊ अक्कलवार, कुच्चीन कैतवास, अक्रम पठाण ,शारीक भाई ,संदीप इंगोले ,नवाब भाई, प्रशांत डेंगळे ,विकास शेळके ,महेश पवार ,जुबेर भाई, सागर ढोके ,सुफियान भाई रिंकू पंचवटे , रफिक भाई आदी सहभागी झाले होते.



# श्री गणेशदास राठी विद्यालयात रंगली स्पर्धा : मोबाईल तारक की मारक विषयावर विद्यार्थ्यांनी मांडले विचार

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शहरातील श्री गणेशदास राठी छात्रालय समिती संचालित श्री गणेशदास राठी विद्यालयात स्नेह मिलन सोहळ्याच्या निमित्ताने मोबाईल चा वापर तारक की मारक या ज्वलंत विषयावर ही स्पर्धा घेण्यात आली होती.वादविवाद स्पर्धेची सुरुवात माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच शाळेचे प्राचार्य श्री संजय पाचंगे सर प्रमुख अतिथी लेखिका कांचन मुरके व साहित्य अकादमी पुरस्कार विजेते पवन नालट,शाळेचे पर्यवेक्षक शैलेश सुताने यांच्या हस्ते करून करण्यात आली.प्रत्येकाच्या गळ्यातला ताईत बनलेला असा मोबाईलचा वापर आज किती प्रमाणात धोक्याचा ठरत आहे तर दुसरीकडे किती प्रमाणात उपयोगाचा आहे या विषयावर विद्यार्थ्यांनी वादविवाद स्पर्धा चांगलीच रंगवली होती.या स्पर्धेत विद्यार्थ्यांना तीन मिनिटात आपला विषय मांडण्याची संधी मिळाली होती यामध्ये प्रथम क्रमांक हर्ष वाघमारे वर्ग दहावा ब, द्वितीय क्रमांक आलोक दारोकार वर्ग दहावा ड. तृतीय क्रमांक सृजल वनवे वर्ग आठवा ब यां विद्यार्थ्यांनी आपले स्थान मिळवले.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे आमचे कर्तव्य - प्राचार्य संजय पाचंगेस्पर्धेत बोलत असताना प्राचार्य संजय पाचंगे म्हणाले की विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे हे आमचे प्रथम कर्तव्य आहे कारण प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये कला दडलेली असते गरज असते ती केवळ व्यासपीठ मिळण्याची तरच तो आपल्या कलेला सिद्ध करू शकतो. वादविवाद स्पर्धे सारख्या अनेक स्पर्धा घेऊन आम्ही या शाळेमध्ये विद्यार्थी विद्यार्थिनी घडवण्याचे काम करत आहे असे ते म्हणाले.या शाळेने मला घडवले -पवन नालट.वादविवाद स्पर्धेत विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना राठी विद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून त्यांनी आपले विचार मांडले यावेळी ते म्हणाले की या शाळेमुळे व शाळेतील शिक्षकांमुळे घडलो आहे. आजही तो काळ ती लावलेली मला शिस्त आणि दिलेले शिक्षण मला आठवत आहे. या शाळेचा मी ऋणी आहे. काळ कितीही बदलून समोर गेला असला तरी आठवणी मात्र कायम स्मरणात राहतात आज मी ज्या पदावर आहे त्याचे श्रेय मराठी विद्यालयातील मला घडवलेल्या सर्व शिक्षकांना जाते असे भावपूर्ण विचार त्यांनी मांडले.विद्यार्थ्यांनो स्वतःच्या जिद्दीने यश मिळवा - कांचन मुरके यांचे आवाहन.वादविवाद स्पर्धेत विद्यार्थी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना लेखिका कांचन मुरके यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या जिद्दीने यश मिळवा आणि त्यासाठी तुम्हाला खरी गरज आहे इतिहासातील मर्दानी स्त्रिया आणि महापुरुषांचा आदर्श समोर ठेवण्याची. खडक फोडून जसं पाणी आपली वाट काढून समोर जातं तसं तुम्हाला येणाऱ्या अडचणींवर मात करून समोर जायचे आहे. असे आवाहन करत वाचन हे तुमच्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे मोबाईल आपलं कार्य करतो तुम्हाला तुमचे कार्य करायचे आहे. वाचन हे तुमची ज्ञानाची गुरुकिल्ली आहे असे सांगितले.वाढदिवस स्पर्धा निरीक्षकाचे काम कांचन मूरके व पवन नालट यांनी पाहिले.

कार्यक्रमात उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व सत्कार शाल श्रीफळ व हस्तकलेने तयार केलेले पुष्पगुच्छ भेट देऊन करण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वीतेसाठी पूनम चौधरी, अर्चना लाहोटी, नीलिमा अंबुलकर,पूजा राठी यांनी अथक परिश्रम घेतले.



# शेतकऱ्यांसाठी पीएम कुसुम सौर कृषिपंप योजना फायदेशीर

## शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन : ९५ टक्क्यांपर्यंत सबसिडी



**अरुण जोशी**

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्य शासनाने १२ मे २०२१ रोजी पीएम कुसुम योजनेसाठी शासननिर्णय निर्गमित केला. यामध्ये शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे, यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना कृषी वापरासाठी पारेषणविरहित सौर कृषिपंप अनुदान तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत ३, ५ व ७.५ एचपी क्षमतेचे सौर कृषिपंप ९० ते ९५ टक्के अनुदानावर उपलब्ध आहेत. सौर कृषिपंपासाठी पात्र लाभार्थींना पंपाच्या क्षमतेनुसार खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यास १० टक्के आणि अनुसूचितजाती अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यास ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरण्यासाठी एसएमएस पाठविला जातो. राज्य शासनाने या योजनेसाठी मान्यता दिली.

या मान्यतेनुसार महाऊर्जेमार्फत लोकसंख्येनुसार जिल्हानिहाय उद्दिष्ट वे निश्चित करण्यात आले आहे.महाऊर्जामार्फत सौर कृषिपंप आस्थापित करण्यात आले आहेत.महाऊर्जाने योजना राबविण्यासाठी स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल विकसित केले आहे. शेतकऱ्यांना योजनेंतर्गत अर्ज करण्यासाठी ऑनलाइन पोर्टल सुरू ठेवण्यात आले आहे. ऑनलाइन पोर्टलव्दारेशेतकऱ्यांकडून अर्ज करण्यापासून कागदपत्रे अपलोड करणे, अर्जाची छाननी करणे, शेतकऱ्यांना लाभार्थ हिस्सा भरण्यासाठी एसएमएस पाठविणे, लाभार्थी हिस्सा ऑनलाइन भरण्याची व पुरवठादार निवडण्याचं शेतकऱ्यांना मुभा देण्यात आले आहे.

### फसवणुकीपासून सावधान

शेतकऱ्यांना जर लाभार्थी हिस्सा भरण्यासाठी खोटा एसएमएस प्राप्त होत असेल तर अशा एसएमएसपासून व त्यामुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या फसवणुकीपासून सावध राहावे, असे जिल्हा व्यवस्थापक, महाऊर्जा जिल्हा कार्यालय, भंडारा यांनी कळविले आहे.

### वीज बिलापासून सुटका

सौर कृषिपंप योजनेमुळे शेतकऱ्यांची महावितरणच्या विद्युत बिलापासून सुटका होणार आहे. शिवाय दिवसा दहा तासापर्यंत वीज मिळविण्याचे लक्षांक यामुळे साधता येणार आहे. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

# शाळांना मिळणार चालू वर्षात तब्बल ९२ सुट्या

## ४४ उन्हाळी, २४ सार्वजनिकसह इतर दिवशीही सुटी

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शाळेला सुटी मिळाली की विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेनासा होतो. सुटीच्या दिवशी काय करायचे, कुठे फिरायला जायचे, काय खायचे आदी प्लॅनिंग ते करतात. शाळेत जाण्यापेक्षाही सुट्या किती याचीच बहुतांश विद्यार्थ्यांना जास्त उत्सुकता असते. आता नुकतेच २०२४ हे नवीन वर्ष सुरु झाले आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने वर्षभरातील सुट्यांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. विविध सण आणि उत्सवादरम्यान तब्बल ९२ सुट्या यावर्षी विद्यार्थ्यांसह शिक्षकांना मिळणार आहे.



दिवाळीसाठी १०, उन्हाळ्यात ४४, स्थानिक सुट्या ९, मुख्याध्यापक आणि जिल्हाधिकाऱ्यांनी घोषित केलेल्या प्रत्येकी ३ सुट्यांचा समावेश आहे. राजुरा, कोरपना, जिवतीतील शाळांना १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्रामची सुटी मिळणार आहे.

**सार्वजनिक सुट्या**

प्रजासत्ताक दिन, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, महाशिवरात्री, होळी, गुड फ्रायडे, गुढीपाडवा, रमजान ईद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रामनवमी, महावीर जयंती, महाराष्ट्र दिन, बुद्ध पौर्णिमा, बकरी ईद, मोहरम, स्वातंत्र्य दिन, पारशी – नववर्ष, गणेश चतुर्थी, ईद–ए–मिलाद, महात्मा गांधी जयंती, दसरा, दिवाळी–लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, गुरुनानक जयंती, ख्रिसमस.

**अशा असतील सुट्या**

जाहीर करण्यात आलेल्या एकूण सुट्यांमध्ये सार्वजनिक २४, जिल्हाधिकाऱ्यांनी घोषित केलेल्या ३. स्थानिक सुट्या ९, मुख्याध्यापक अधिकारातील सुट्या २. उन्हाळ्यातील ४४ आणि दिवाळीसाठी १० दिवसांच्या सुट्या राहणार आहे. विशेष म्हणजे, दिवाळीच्या दहा दिवसाच्या सुट्या रविवार आणि शासकीय सुट्या वगळून राहणार आहे.

# विदर्भस्तरीय सायकलिंग स्पर्धेत नंदकिशोर इटोले तृतीय क्रमांकाचा मानकरी

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावतीमध्ये आयोजित विदर्भस्तरीय सायकलींग स्पर्धेत श्री नंदकिशोर इटोले यांनी तृतीय क्रमांक मिळवीत उत्कृष्ट सायकलपटूचा पुरस्कार पटकाविला. नंदकिशोर इटोले हा समर्थ हायस्कूलमध्ये इयत्ता सातवीत शिकत असून सायकलींचे कुठल्याही प्रकारचे प्रशिक्षण न घेता त्याने हे यश संपादन केले आहे . अमरावती सायकलींग असोसिएशन द्वारा आयोजित विदर्भस्तरीय सायकलींग स्पर्धेत बारा वर्षा आतील गटात श्री नंदकिशोर इटोले याने १५ किमी अंतर २८.३३ मिनिटात पूर्ण करीत तृतीय क्रमांक मिळविला. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्याला रोख दोन हजार रुपये ,मेडल आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.श्री नंदकिशोर इटोले याने आपल्या यशाचे श्रेय आई–वडील आणि वर्गशिक्षकांना दिले असून त्याचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.



# जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवाला रंगतदार सुरुवात

## टीम म्हणून कार्य केल्यास आदर्शाची निर्मिती – जिल्हाधिकारी सौरभ कटियार



**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रिडा महोत्सवाला गुरुवारला (ता.११) सुरुवात श्री.हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या पटांगणात सुरुवात झाली असून या क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवाचे विधिवत उद्घाटन अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते झाले.या महोत्सवाच्या निमित्तानेसांघिक व वैयक्तीक स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी मिळत आहे. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन झाले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अविशांत पंडा हे होते.तर याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी,मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी चंद्रशेखर खंडारे,प्रकल्प संचालक प्रिती देशमुख,उप मुख्य कार्यकारी अधिकारी बी.टी.बायस,श्रीराम कुलकर्णी,उपमुख्य लेखा तथा वित्त अधिकारी आश्रिवनी,पशुसंवर्धन अधिकारी श्री सोळंके,बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड,उपशिक्षणाधिकारी श्रीमती खान,श्री.हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे डॉ.भालेराव,यांच्यासह सर्व खाते प्रमुख,गटविकास अधिकारी उपस्थित होते.तर व्यासपीठावर क्रिडा महोत्सवाचे सचिव डॉ.कैलास घोडके,क्रिडा संयोजक डॉ.नितिन उंडे,गटविकास अधिकारी प्रफुल्ल भोरकडे, तेजस्वी आवळे,जिवनलाल भिलावेकर, बाळासाहेब रायबोले, सुधीर अरबट,विनोद खेडकर, मोहन श्रृंगारे, उज्वला ढोले, वासुदेव कनाटे, माया वानखडे,प्रकाश नाडकर आदींची उपस्थिती होती. यासह चौदा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी, महिला विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, शिक्षक व जिल्ह्यातील ईतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रारंभी दिंडी व स्वागत गीताने सर्वांचे स्वागत करण्यात आले.त्यानंतर १४ पंचायत समिती मधील सहभागी अधिकारी व कर्मचारी यांचे पथ संचालन करण्यात आले.तसेच याप्रसंगी निदर्शने व विविध देखावे सादर करण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी क्रीडा ज्योत पेटवून रीतसर उद्घाटन केले. यावेळी बोलतांना अनेक कार्यालय मध्ये कर्मचाऱ्यांच्या न्यायहक्कासाठी कर्मचाऱ्यांचे विघटन होऊन संघटना स्थापन होतात. क्रीडा स्पर्धेदरम्यान सर्वांनी एकत्र येत उत्कृष्ठ सादरीकरण करावयाचे आहे. सर्वांनी एकत्र काम केल्यास आदर्श कामाची निर्मिती होते. यापूर्वी आपल्या जिल्ह्याने एकसंघ काम करून पोषण समृध्दी अभियान, घरकुल योजना,मनरेगा योजनांमध्ये राज्यात नाव कमविले आहे. क्रीडा महोत्सव प्रमाणे वर्षभर कर्मचाऱ्यांनी काम केल्यास जिल्हा आदर्श होणार असल्याचे सौरभ कटियार यांनी सांगितले. आपल्या अध्यक्षीय भाषणात अविष्यांत पंडा यांनी ज्याप्रमाणे जानेवारी महिन्यात कर्मचारी उस्फुर्तपणे महोत्सवात सहभागी होऊन आनंदोत्सव साजरा करतात त्याचप्रमाणे हा उत्साह कार्यालयमध्ये डिसेंबरपर्यंत उत्साह व एकोपा कायम ठेवण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी अविष्यांत पंडा यांनी केले. या तिन दिवसीय जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवात १४ तालुका संघ,१ मुख्यालय व १अधिकारी वर्ग असे १६ संघ सहभागी झाले आहे.यात ५७ प्रकारच्या खेळांचा समावेश करण्यात आला असून सांस्कृतिक कार्यक्रमात ९ प्रकारचे कार्यक्रम सादर करण्यात येत आहे.प्रास्तविक क्रिडा महोत्सवाचे सचिव डॉ.कैलास घोडके यांनी केले.संचालन प्राजक्ता राऊत,अजय अडिकणे यांनी केले.तर आभार क्रिडा संयोजक डॉ.नितिन उंडे यांनी मानले.असे क्रिडा महोत्सवाचे प्रसिध्दी समितीचे राजेश सावरकर,शकील अहमद,विनायक लकडे यांनी कळविले आहे.

सांघिक व वैयक्तीक स्पर्धा मध्ये क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो–खो, टेनिक्काईट, बॅडमिटन, टेबल टेनिस, कॅरम, बुध्दीबळ, जलतरण, धावणे, भालाफेक, गोळाफेक, थाळीफेक, लांब उडी,उंच उडी महीला व पुरूष खेळाडू सहभागी झाले आहे.

सांस्कतिक कार्यक्रमा मध्ये भक्तीगीत, भावगीत, लोकगीत, सिनेगीत, करावके गीत, समुह गीत,एकल गीत, युगलगीत,अभिनय,झाँकी याचा समावेश आहे. दरम्यान गुरुवारी (ता.११) अंजनगाव सुर्जी, मोर्शी,अधिकारी वर्ग, चांदुर रेल्वे, दर्यापूर, चिखलदरा, धामणगाव रेल्वे, नांदगाव खंडेश्वर येथील कार्यक्रम सादर करण्यात आले तर १२ जानेवारीला तिवसा, भातकुली, धारणी, अचलपूर, मुख्यालय, अमरावती, चांदुर बाजार, वरुड हे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणार आहे.

### निदर्शने ठरली लक्षवेधी

या महोत्सव दरम्यान सर्व पंचायत समिती व मुख्यालय मार्फत विविध विषयावर निदर्शनाचे सादरीकरण करण्यात आले.यावेळी भरडधान्य,मेळघाटातील आदिवासी गदली नृत्य, महाराष्ट्र संस्कृती,राणी लक्ष्मीबाई, महादेवाचे तांडव नृत्य ,बंजारा नृत्य आदी उपस्थितांच्या केंद्रस्थानी होते. मोर्शी पंचायत समितीच्या महादेव व नंदीच्या नृत्यानी अनेकांचे लक्ष वेधून घेतले.

# लखाड येथिल पोलीस पाटील एका महिन्यासाठी निलंबित : निष्काळजीपणा व बेजबाबदार राहणे पोलीस पाटलांच्या आले अंगलट

**दि११विदर्भ प्रजासत्ताक अंजनगाव सुर्जी**

ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्थेचे रक्षक म्हणून पोलीस पाटील हे राज्याच्या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेत महत्वाचे स्थान असलेले पद आहे. पोलीस पाटील हा पोलीस विभाग आणि स्थानिक समुदाय यांच्यातील महत्वाचा दुवा म्हणून सुद्धा काम पाहतो मात्र अनेक पोलीस पाटील निष्काळजीपणे व बेजबाबदार पणे वागतात असाच एक प्रकार अंजनगाव तालुक्यात लखाड येथिल पोलीस पाटील राहुल सावरकर यांच्या अंगलट आल्याचा प्रकार उघडकीस आला .ग्राम लखाड येथिल पोलीस पाटील राहुल सावरकर यांचे कर्तव्याप्रती बेजबाबदार पणे व निष्काळजीपणे वागत असल्याचा अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनने गोपनीय तक्रार अहवाल उपविभागीय महसूल अधिकारी यांना पाठविला होता त्या आधारे उपविभागीय महसूल अधिकारी दर्यापूर यांनी महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम १९६७ चे कलम (९) अन्वये नुसार राहुल सावरकर पोलीस पाटील लखाड यांना एका महिन्यासाठी निलंबित करण्यात आल्याचे पत्र पोलीस स्टेशन अंजनगाव व राहूल सावरकर यांना प्राप्त झाले असून त्याचा पदाचा कार्यभार सर्फाबाद येथिल पोलीस पाटील रामेश्वर चौखंडे यांना तात्काळ सुपूर्द करण्याचे पत्रात आदेशीत असल्याने संपुर्ण तालूक्यात खळबळ उडाली आहे. यासंदर्भात पोलीस पाटील राहुल सावरकर यांना विचारणा केली असता.मी कोरोणा काळात केलेले काम,तसेच गावातील शांतता बाधीत होऊ नये यासाठी केलेले प्रयत्न तालूक्यातील सर्वांना माहीत आहे परंतू तत्कालीन ठाणेदार यांनी सेवानिवृत्तीच्या दोन दिवस अगोदर माझ्या विरोधात अहवाल पाठवून आणि मला न्यायाची कुठलीही संधी न देता माझ्यावर कारवाही करण्यात आली असे राहूल सावरकर यांनी सांगितले.



# प्लास्टिक पिशव्या तपासणी डस्टबिन बाबत दंडात्मक मोहिम

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महापालिका आयुक्त व मा. उपआयुक्त (प्रशा) यांचे आदेशानुसार व सहा.आयुक्त झोन क्र.४ व मा.वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) यांचे निर्देशानुसार दक्षिण झोन क्र.४ बडनेरा अंतर्गत पतंग चाइना मांझा जप्ती व दंडात्मक, प्लास्टिक मोहिम आज दिनांक ११/०१/२०२४ रोजी बडनेरा नवीवस्ती, बाजार परिसर व जुनीवस्ती येथे पतंग विक्रेते दुकानदारांची तपासणी करण्यात आली व प्लास्टिक पिशव्या तपासणी व डस्टबिन बाबत दंडात्मक मोहिम राबविण्यात आली.

# डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे ११ विद्यार्थी गुणवत्ता यादीत : यशाची परंपरा कायम



**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे ११विद्यार्थी यावर्षी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आले आहे. डॉ.पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखल्यामुळे महाविद्यालयाचे व गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.येथील डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय च्या विद्यार्थ्यांनी सत्र २०२२ –२३ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत घवघवीत यश मिळवून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे. पाच वर्षीय एलएलबी अभ्यासक्रमात एकूण पाच विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहे. विशेष म्हणजे विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत पाचही मेरिट हे डॉ.पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालयाचे विद्यार्थी आहे. यामध्ये विद्यापीठातून प्रथम येण्याचा बहुमान संकेत इंगळे यांनी पटकाविला. तर द्वितीय क्रमांक आकांक्षा असणारे, तृतीय क्रमांक अरिहंत कोठारी ,चौथा क्रमांक चैतन्य अग्रवाल तर पाचवा क्रमांक ओमकार देशपांडे यांनी पटकावला आहे. याच महाविद्यालयाच्या एल एल एम अभ्यासक्रमातील चार विद्यार्थ्यांनी देखील गुणवत्ता यादीत येण्याचा बहुमान मिळवला आहे. यामध्ये विद्यापीठ गुणवत्ता यादीत गायत्री जगताप हिने दुसरा क्रमांक पटकावला असून अफरोज खान यांनी तृतीय तर रक्षा चोरडिया यांनी चौथा क्रमांक आणि पिंकी जगलाल यांनी पाचवा क्रमांक मिळविला आहे. डॉ.पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालयाच्या एलएलबी तीन वर्षी अभ्यासक्रमांमध्ये दोन विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले असून यामध्ये महाविद्यालयाची आनंदा आचार्य यांनी पाचवा तर विशाखा बीडवाई हिने सातवा क्रमांक प्राप्त करून यश मिळविले आहे.या यशाबद्दल प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख ,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे